cmyk

## संपादकीय

### अर्थसंकल्पातून मध्यमवर्गीयांची कोंडी फोडण्याची गरज

नव्या अर्थसंकल्पात १५ ते २० लाख उत्पन्न असणाऱ्यांसाठी नवा स्लॅब आणला जाऊ शकतो. या नव्या स्लॅबमध्ये टॅक्स ३० टक्क्यांवरून २५ टक्क्यांपर्यंत कमी केला जाईल असा अंदाज आहे. हा बदल उच्च उत्पन्न गटासाठी दिलासादायक ठरू शकेल. नव्या कर प्रणालीनुसार ७.७५ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त आहे. ही मर्यादा १० लाखांपर्यंत वाढवली तर त्याचा लाखो लोकांना फायदा होईल. हा बदल झाल्यास १० लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न पूर्णपणे करमुक्त होऊ शकते.

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२७४ | शनिवार, दि.२५ जानेवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

D.S.Nagargoje 8908165555 9175606738
A.S.Nagargoje 9284872700 8007003550
बालाजी बॅटरी हाऊस
सेल्स अ‍ॅण्ड सर्व्हीसेस
आमच्याकडे सर्व प्रकारच्या बॅटरी योग्य दरात मिळतील.
पत्ता : काकु-नाना हॉस्पिटल समोर, जालना रोड, बीड.

# सोयाबीनची खरेदी वेगाने सुरु

## उद्दीष्ट संपले तरी खरेदी सुरुच राहणार; जिल्हांना मिळणार वाढीव उद्दीष्ट

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्यात खरेदी सुरु झाली तेव्हापासून अडचणी कायम होत्या. त्यामुळे सुरुवातीच्या अडीच महिन्यांमध्ये खरेदी रखडच सुरु होती. शेवटच्या पंधरा दिवसांमध्ये बारदाणा नसल्याने बहुतांशी केंद्रांवर खरेदी ठप्प होती. यातच १२ जानेवारीची पहिली खरेदीची मुदत संपली. सरकारने नंतर ३१ जानेवारीपर्यंत मुदतवाढ दिली. सुरुवातीचे दोन–तीन दिवस तरीही बारदाणा मिळाला नव्हता. मात्र नंतर सरकारने बारदाणा उपलब्ध करून दिला. आता खरेदी वेगाने सुरु आहे. दरम्यान, ज्या जिल्ह्यांचे सोयाबीन खरेदीचे उद्दीष्ट पूर्ण झाले त्या जिल्ह्यांना पुन्हा वाढीव उद्दीष्ट देण्यात येणार आहे.**

राज्यात आतापर्यंत जवळपास साडेसात लाख टन सोयाबीनची खरेदी झाली आहे. तसेच मुदतीत खरेदी पूर्ण करण्याचे उद्दीष्ट आहे, अशी माहिती पणन मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी दिली. सोयाबीनमधील कमी झालेला ओलावा आणि चांगली आवक यामुळे राज्यातील सोयाबीनच्या खरेदीने चांगला वेग घेतला होता. बारादाणाही पुरेसा उपलब्ध असल्याने खरेदी चांगली सुरु होती.

पान २ वर




### जिल्ह्यांना वाढीव उद्दीष्ट देऊन खरेदी करणार

जिल्ह्यांचे खरेदीचे उद्दीष्ट पूर्ण झाल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रमावस्था होती. उद्दीष्ट संपले म्हणजे खरेदी बंदच होणार, अशी चर्चा सुरु आहे. पण पणन मंत्रालयाने याबाबत स्पष्टीकरण दिले, ज्या जिल्ह्यांचे खरेदीचे उद्दीष्ट पूर्ण झाले त्या जिल्ह्यांना सुधारित वाढीव उद्दीष्ट देण्यात येईल. मात्र खरेदी सुरुच राहील, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. म्हणजेच जिल्ह्याचे खरदीचे उद्दीष्ट पूर्ण झाले तरी खरेदी थांबणार नाही तर जिल्ह्यांना वाढीव उद्दीष्ट देण्यात येणार आहे.

### महाराष्ट्रात उद्दिष्टापेक्षा कमी खरेदी

पणन मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात २३ जानेवारीपर्यंत ७ लाख २८ हजार टनांची खरेदी झाली होती. राज्यात एकूण १४ लाख १३ हजार टन खरेदीचे उद्दीष्ट आहे. म्हणजेच एकूण उद्दीष्टाच्या केवळ ५२ टक्के खरेदी पूर्ण झाली. तर पहिल्या टप्प्यातील १० लाख टनांच्या उद्दीष्टाच्या तुलनेत जवळपास ७३ टक्के खरेदी झाली. म्हणजेच अजूनही पहिल्या टप्प्यातील उद्दीष्टही साध्य झालेले नाही.

## पीएम किसानचा १९ वा हप्ता फेब्रुवारीला – केंद्रीय कृषिमंत्री चौहान



**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी किसान योजनेच्या म्हणजेच पीएम किसान योजनेचा १९ वा हप्ता २४ फेब्रुवारीला शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी बिहारमध्ये १९ व्या हप्त्याचे वितरण करणार असल्याची माहिती केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी दिली. चौहान बिहारमधील पटणा येथे कर्पूरी ठाकूर यांच्या १०१ व्या जयंती निमित शुक्रवारी (दि.२४) बोलत होते.**

पीएम किसान योजनेचा १८ हप्ता महाराष्ट्रातील वाशिम जिल्ह्यातून ५ ऑक्टोबर रोजी वितरित करण्यात आला होता. त्यावेळी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची पार्श्वभूमी होती. २० हजार कोटी रुपयांची निधी देशभरातील ९ कोटी शेतकऱ्यांना देण्यात आला. २०२५ मध्ये बिहारमधील विधानसभा निवडणूका होणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारकडून

पान २ वर

# धनंजय मुंडेच्या राजीनाम्याबाबत पक्षाची भुमिका काय?

## आ.विक्रम काळेंनी थेटच सांगून टाकले; आमदारांच्या बैठकीत काय घडले?





**धाराशिव । प्रतिनिधी**

सरपंच संतोष देशमुख खून प्रकरणात वाल्मिक कराडचे नाव येत असल्याने मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी पुढे येऊ लागली आहे. यातच मुंडे यांच्या राजीनाम्याबाबत पक्षाची काय भुमिका आहे हे आ. विक्रम काळे यांनी सांगितले असून आमदारांच्या बैठकीत यावर चर्चा झाली की नाही याबद्दल विधान केले आहे.

सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून हत्या करण्यात आली. या घटनेने राज्यातील वातावरण चांगलेच तापले आहे. या प्रकरणात आतापर्यंत ७ जणांवर मकोका अतंर्गत कारवाई करण्यात आली आहे, तर एक

पान २ वर

### नेमकं काय म्हणाले विक्रम काळे?

मंत्री धनंजय मुंडे यांच्या बाबत योग्य वेळी योग्य निर्णय घेतला जाईल, असे वक्तव्य राष्ट्रवादीचे आमदार विक्रम काळे यांनी धाराशिवमध्ये केले आहे. अजितदादा दर मंगळवारी सर्व आमदारांची बैठक घेतात, याही मंगळवारी बैठक झाली. मात्र या बैठकीत धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेण्याबाबत कुठलीही चर्चा झाली नाही. परंतु जर कोण मस्साजोग हत्या प्रकरणात दोषी असेल तर योग्य वेळी योग्य निर्णय पक्ष घेईल, त्याच बरोबर मस्साजोग या प्रकरणात कोणालाही आमचा पक्ष आणि सरकार पाठीशी घालणार नाही. जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल, असे काळे यांनी म्हटले आहे.

### षडयंत्र झाले असतील तर आता जेलमध्ये जा– जरांगे

वाल्मिक कराड याला रुग्णालयात दाखल केल्यानंतर मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी यावर प्रतिक्रिया देताना शंका उपस्थित केली आहे. सुटून जायचे किंवा इतर सर्व षडयंत्र झाले असतील तर आता परत जेलमध्ये जावे, डॉक्टर नक्की कोणत्या तपासण्या करत आहेत, काय ऑपरेशन सुरू आहे? सुटून जायचे ऑपरेशन सुरू आहे का? पोलीस अधिकारी आणि डॉक्टरांमध्ये नेमकं काय सुरू आहे? असे अनेक प्रश्न मनोज जरांगे पाटील यांनी उपस्थित केले आहेत.

### वाल्मिक कराड आयसीयूमध्ये

वाल्मिक कराडवर देखील मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे, मात्र त्याची प्रकृती अचानक बिघडल्याने त्याला जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दोन दिवसापासून कराड आयसीयुमध्ये उपचार घेत आहेत.

# महादेव मुंडे प्रकरणाचा तपास गुन्हे शाखेकडे द्या

## आ.सुरेश धसांनी घेतली पोलिस अधिक्षकांची भेट



**बीड । प्रतिनिधी**

**आ. सुरेश धस यांनी बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांची भेट घेतली आहे. महादेव मुंडे हत्या प्रकरणी ही भेट घेण्यात आली असून महादेव मुंडे हत्या प्रकरणाचा तपास हा गुन्हे शाखेकडे देण्याची मागणी यावेळी आ. धस यांनी केली.**

सुरेश धस यांनी नवनीत कॉवत यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान, महादेव मुंडे हत्या प्रकरणाचा

पान २ वर

### एलसीबीच्या प्रमुखांना आकानेच बसवले

एलसीबीचे जे प्रमुख आहेत त्यांना आकाने बसवले आहे. त्यामुळे एलसीबीच्या प्रमुखाला वगळून या प्रकरणाता तपास एलसीबीकडे द्या, अशी मागणीही सुरेश धस यांनी यावेळी केली. त्यामुळे आता पोलिस अधिक्षक नवणीत काँवत एलसीबी प्रमुख शेख उस्मान यांच्याविषयी काय भुमिका घेतात? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मनोज जरांगेंचे आजपासून उपोषण



जालना : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे हे दि. २५ जानेवारीपासून आमरण उपोषण करणार आहेत. देवेंद्र फडणवीस हे मराठ्यांशी बेईमानी करणार नाहीत. फडणवीसचे मराठ्यांना आरक्षण देतील असा विश्वास मनोज जरांगेंनी व्यक्त केला आहे.

# एसटी बसचा प्रवास आजपासून महागला!

**पुणे । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने एसटीच्या भाड्यात वाढ करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिल्यांनंतर एसटीच्या भाड्यात १४.९५ टक्के वाढ होणार आहे. ही भाडेवाढ २५ जानेवारीपासून लागू होणार आहे.**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला होता. महाराष्ट्र मोटार वाहन विभागानं प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात या संदर्भातील माहिती देण्यात आली आहे. राज्याच्या गृह विभागाचे (वाहतूक) अपर मुख्य सचिव आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली बैठक

पान २ वर



## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२४ जानेवारी २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १०.५० क्विंटल | २,५६१ | ३,५०२ | ३,०३६ |
| ज्वारी/हायब्रिड : २७.०० क्विंटल | २,००० | २,६०० | २,३८६ |
| मका/लोकल: ०.५० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : १०१.५० क्विंटल | ६,६०० | ७,१९३ | ७,०१७ |
| उडीद : १.५० क्विंटल | ६,३०० | ६,३०० | ६,३०० |
| बाजरी: ४.५० क्विंटल | २,४०१ | २,७२० | २,६०३ |
| मुग : ०.५० क्विंटल | ७,२५० | ७,२५० | ७,२५० |
| सोयाबीन: ९५.०० क्विंटल | ४,००० | ४,१०० | ४,०६६ |
| हरभरा: १७९.५० क्विंटल | ३,९५० | ४,१०१ | ४,०६३ |

## शाहांच्या कार्यक्रमात भुजबळांना मानाचे स्थान

**नाशिक। प्रतिनिधी**

मालेगावमध्ये सहकार परिषद कार्यक्रमात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमात अमित शाहांच्या डाव्या बाजूला छगन भुजबळ तर उजव्या बाजूला एकनाथ शिंदे बसले होते. अमित शाहांच्या डाव्या बाजूला भुजबळ बसल्याने जोरदार राजकीय चर्चा सुरु झाली आहे. शहांच्या कार्यक्रमात भुजबळांना मानाचे स्थान दिल्याने वेगळ्या राजकीय समीकरणाची तर ही नांदी नाही ना? अशी चर्चा आता रंगू लागली आहे.

## राज्यातल्या प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात सुरु होणार मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष

**मुंबई । प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामध्ये सादर झालेल्या अर्जाचा पाठपुरावा करण्यासाठी रुग्ण व त्यांचे नातेवाईक मंत्रालयात येत असतात. नागरीकांना या सेवा सहजपणे उपलब्ध व्हाव्यात याकरीता जिल्हाधिकारी कार्यालयात "मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष" सुरु करण्यात येणार असून याबाबत**


पान २ वर

# येत्या पाच वर्षांत घरगुती विजेचे दर २३ टक्क्यांनी कमी होणार!

## महावितरण चे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक यांची माहिती, एक एप्रिल पासून दर कपातीचे लाभ टप्प्याटप्प्याने मिळणार

**पुणे । प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० योजनेमुळे पुढील दोन वर्षांत कार्यरत होणाऱ्या सौर उर्जा प्रकल्पांमुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा होणार असून घरगुती ग्राहक, औद्योगिक ग्राहक यांनाही मोठा फायदा होणार आहे. सौर उर्जा प्रकल्पांमुळे आगामी पांच वर्षांत १०० युनिट पर्यंत वीज वापर असणाऱ्या घरगुती ग्राहकांसाठीचे वीज दर ५ रु. ८७ प्रति युनिट पर्यंत तर १०१ ते ३०० युनिट वापर असणाऱ्या घरगुती ग्राहकांसाठीचे दर ११.८२ रु. प्रति युनिट पर्यंत टप्प्याटप्प्याने कमी होतील, एक एप्रिल पासून महावितरण च्या घरगुती ग्राहकांना दर कपातीचे लाभ टप्प्याटप्प्याने मिळू लागतील. अशी माहिती महावितरण चे स्वतंत्र संचालक व भाजपा प्रदेश सह मुख्य प्रवक्ते विश्वास पाठक यांनी शुक्रवारी दिली.**



पुढे बोलताना विश्वास पाठक म्हणाले की, १०० युनिट पर्यंत वीज वापर असणाऱ्या घरगुती ग्राहकांसाठीचे वीज दर ५ रु. ८७ पर्यंत तर १०१ ते ३०० युनिट वापर असणाऱ्या घरगुती ग्राहकांसाठीचा दर ११.८२ रु. पर्यंत कमी करण्याचा प्रस्ताव महावितरण ने राज्य वीज नियामक आयोगापुढे ठेवला असल्याचे नमूद केले. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत विश्वास पाठक बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली सौर ऊर्जा निर्मितीच्या धडाकेबाज कार्यक्रमामुळेच शेतकरी, घरगुती व औद्योगिक ग्राहकांचा फायदा होणार असल्याचे विश्वास पाठक यांनी स्पष्ट केले. विश्वास पाठक पुढे बोलताना म्हणाले की, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० योजनेमुळे राज्यात आगामी दोन वर्षांत १६ हजार मेगावॅट एवढी सौर वीज निर्मिती होणार आहे. त्याचा मोठा फायदा महावितरणला होणार आहे. महावितरणचा सरासरी वीज पुरवठ्याचा दर कमी होणार असल्यामुळे १०० युनिट वापर असणाऱ्या

पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# अर्थसंकल्पातून मध्यमवर्गीयांची कोंडी फोडण्याची गरज

नव्या अर्थसंकल्पात १५ ते २० लाख उत्पन्न असणाऱ्यांसाठी नवा स्लॅब आणला जाऊ शकतो. या नव्या स्लॅबमध्ये टॅक्स ३० टक्क्यांवरून २५ टक्क्यांपर्यंत कमी केला जाईल असा अंदाज आहे. हा बदल उच्च उत्पन्न गटासाठी दिलासादायक ठरू शकेल. नव्या कर प्रणालीनुसार ७.७५ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त आहे. ही मर्यादा १० लाखांपर्यंत वाढवली तर त्याचा लाखो लोकांना फायदा होईल. हा बदल झाल्यास १० लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न पूर्णपणे करमुक्त होऊ शकते. याचा लहान आणि मध्यमवर्गीय लोकांना अधिक फायदा होईल. नव्या करप्रणालीत अधिकाधिक करदात्यांना सामावून घेण्याचा प्रयत्न असेल. आगामी अर्थसंकल्पात मध्यमवर्गाला दिलासा दिला गेल्यास त्यांची क्रयशक्ती वाढू शकते पर्यायाने भारतीय अर्थव्यवस्थेला गती मिळू शकेल. करसवलती आणि स्लॅबमधील बदलामुळे लोकांच्या हातात अधिक पैसा येईल, क्रयशक्ती वाढेल आणि अर्थव्यवस्थेत वेगाने वाढ होईल.

देशातला मध्यमवर्ग आज चोहोबाजूंनी संकटात आहे. मध्यंतरी बँकांचे व्याजदर कमी झाल्यामुळे नफा मिळवण्यासाठी मध्यमवर्ग मोठ्या प्रमाणात शेअर बाजार आणि म्युच्युअल फंडाकडे वळला होता. तेथील गुंतवणुकीवर चार पैसे जास्त मिळतील अशी त्याची अपेक्षा होती. पण गत चार महिन्यांचा आढावा घेतल्यानंतर तेथेही मध्यमवर्गीयांची फसगत झाल्याचे दिसून आले. काही दिवसांपूर्वी झालेल्या घडामोडीमुळे ते अधिक स्पष्ट झाले. नुकतीच १३ जानेवारी रोजी शेअर बाजारात मोठी घसरण झाली त्यातून शेअरचे मूल्य तब्बल १२ लाख कोटी रुपयांनी घसरले. गत सप्टेंबरपासून शेअर बाजार सातत्याने कोसळतो आहे. एका अंदाजानुसार या चार महिन्यांत शेअर बाजारात गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदारांचे ४० लाख कोटी रुपये बुडाले आहेत. शेअर बाजारात फक्त श्रीमंत लोक गुंतवणूक करतात असा पूर्वी समज होता. परंतु हा समज चुकीचा असल्याचे दिसून आले आहे. विशेषत: मोदी सरकार सत्तेवर आल्यापासून मध्यमवर्गीयही मोठ्या प्रमाणावर शेअर बाजाराकडे वळल्याचे दिसून येते. त्यातही म्युच्युअल फंडाकडे त्यांचा विशेष ओढा असल्याचे आढळून आले आहे. परंतु आता तेथेही गुंतवणूक सुरक्षित नाही असे दिसते. खरे पाहता मोदी सरकार सत्तेवर आल्यानंतर शेअर बाजारातील गुंतवणुकीतून मिळणाऱ्या नफ्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर घटले आहे. तरीही मध्यमवर्गीयांनी मोदींच्या नेतृत्वावर विश्वास दाखवत शेअर बाजारात गुंतवणूक करण्यावर भर दिला. परंतु त्यापासून फारसा लाभ मिळालेला नाही. मोदी काळात मिळालेल्या लाभाची तुलना मनमोहनसिंग सरकारच्या काळाशी केल्यास मोदी सरकारची कामगिरी फिकीच दिसते. मनमोहन सिंग यांच्या कारकीर्दीत शेअर बाजारातील गुंतवणुकीतून १७९ टक्के परतावा मिळाला होता. त्या तुलनेत मोदी सरकारची कारकीर्द अगदीच नगण्य आहे. मोदी सरकारच्या पहिल्या टर्ममध्ये ६१.२ टक्के परतावा मिळाला होता, दुसऱ्या टर्ममध्ये तो ८१ टक्के झाला आणि तिसऱ्या टर्ममध्ये आतापर्यंत तो अवघा ९.२ टक्के आहे. त्यामुळे सध्या मध्यमवर्ग कोंडीत पकडला गेला आहे. तो चारही बाजूंनी कराच्या बोजाखाली दबला जात आहे आणि मोदी सरकारची तुंबडी मात्र ओसंडून वाहत आहे. विविध करांच्या ओझ्याखाली मध्यमवर्गीय इतका दबला गेला आहे की त्याला जगणेही मुश्कील झाले आहे. मध्यमवर्गीयांचे उत्पन्नही फारसे वाढलेले नाही. त्यामुळे आता उद्योग क्षेत्रातील संघटनांनीच लोकांवरील करबोजा कमी करा, अशी मागणी सुरू केली. मोदी सरकारने कॉर्पोरेट सेक्टरचा टॅक्स कमी केला पण मध्यमवर्गीयांना दिलासा मिळेल अशी कोणतीही कृती केली नाही. कॉर्पोरेट सेक्टरवरील टॅक्स कमी केल्याने या क्षेत्रातून गुंतवणूक वाढेल आणि रोजगाराला चालना मिळेल अशी मोदी सरकारची अपेक्षा होती पण ती फोल ठरली. देशाच्या आर्थिक क्षेत्रात मोठी पडझड होताना दिसते आहे. त्यामुळे विदेशी गुंतवणूक भारतात येण्यास धजावत नाही. ज्या विदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारात गुंतवणूक केली ती काढून घेतली जात आहे. बाजारात मागणीच नाही. त्यामुळे त्याचा थेट परिणाम निर्मिती क्षेत्रावर होत आहे. निर्यातही कमी होत आहे. विविध कंपन्यांच्या मालाला देशांतर्गत उठाव नाही आणि त्यात भर म्हणजे रुपया रोज नीचांकी पातळी गाठतो आहे. डॉलरच्या तुलनेत रुपयाने ८६ रुपयांचा टप्पा ओलांडला आहे. याचा मोठा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर झाला आहे. देशातल्या गरिबांची मोदींना फारशी चिंता असल्याचे कधीच जाणवले नाही. त्यांना अदानी, अंबानी जवळचे वाटतात. देशाचा राष्ट्रीय विकासदर निराशाजनक कामगिरी करताना दिसतो आहे. मागच्या आर्थिक वर्षात जीडीपी आठ टक्क्यांपेक्षा अधिक होता. यंदा तो ६.४ टक्क्यांवर घसरला आहे. सध्या केंद्रातील सरकार उत्तर प्रदेशातील महाकुंभमेळा आणि दिल्लीतील निवडणुकीत गुंतले आहे. त्यामुळे सध्यातरी गरीब, मध्यमवर्गीय रामभरोसेच आहेत. आगामी अर्थसंकल्पाकडे ते आशेने पाहत आहेत. त्यांना दिलासा मिळेल का असा प्रश्न विचारला जात आहे.

# दिंद्रुडच्या केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या वतीने रक्तदान शिबिर

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

**सध्या सर्वत्र रक्ताचा तुटवडा निर्माण झाला आहे, अत्यावश्यक बाबीत रक्ताची नितांत गरज असताना रुग्णांना तात्काळ रक्त मिळावे यासाठी बीड जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिष्ट असोसिएशनच्या सदस्यांनी गाव पातळीवर रक्तदान शिबिराचे आयोजन शुक्रवारी केले होते, दिंद्रुड येथील ५० रक्तदात्यांनी येथे पार पडलेल्या रक्तदान शिबिरात रक्तदान करीत सामाजिक सेवेचा वसा जोपासला.**

ऑल इंडिया केमिस्ट अँड ड्रगिष्ट असोसिएशनचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त शुक्रवारी देशभरात असोसिएशनच्या वतीने विविध ठिकाणी रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. बीड जिल्ह्यातील अनेक गावात या शिबिराच्या आयोजनाखाली शेकडो रक्तदात्यांनी रक्तदान करीत सामाजिक सेवा बजावली. दिंद्रुड येथील श्रेया मेडिकल, मातोश्री मेडिकल, ऋषिकेश, मेडिकल,यशवंत मेडिकल,रेनगडे मेडिकल,शिफा मेडिकल,अंबिका मेडिकल व प्रफुल्ल मेडिकल या केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचा सदस्यांनी या रक्तदान शिबिराचे




आयोजन केले होते. बीड येथील वैद्यकीय टीम रक्तसंचय करण्यासाठी दिंद्रुड येथे शुक्रवारी सकाळी दाखल झाली होती. रक्तदान केल्यानंतर रक्तदात्यांना फळे व नाश्त्याची सोय येथील मेडिकल असोसिएशनच्या वतीने करण्यात आली होती.

## श्रीमती प्राजक्ता पाटील राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्काराने सन्मानित

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगाव येथील केंद्रीय जि.प.शाळेतील सहशिक्षिका श्री. प्राजक्ता पाटील यांना नुकतेच मैत्रा फाउंडेशनच्या वतीने त्यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्काराने देऊन त्यांचा गौरव करण्यात आला आहे.

शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्यां शिक्षकांना सेवाभावी मैत्रा फाउंडेशनच्या वतीने दरवर्षी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करतात त्याचप्रमाणे यावर्षी त्यांनी शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्या केल्या शिक्षकांचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला असुन यामध्ये युसूफवडगाव येथील केंद्रीय जि.प शाळेतील सहशिक्षिका श्रीमती प्राजक्ता पाटील यांना त्यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्यातील योगदानाबद्दल त्यांचा मान्यवरांच्या हस्ते मैत्रा फाउंडेशनच्या वतीने राज्यस्तरीय आदर्श शिक्षिक पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून खटोड प्रतिष्ठानचे अध्यक्ष गौतमजी खटोड तर प्रमुख पाहुणे म्हणून संग्रामजी धनवे,दिनेशजी पवार,अनिल जाधवर,राजू वंजारे,हर्षा ढाकणे,संगीता आदमाने हे प्रमुख अतिथी उपस्थित होते. यावेळी मैत्रा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष श्री द.ल.वारे,उपाध्यक्ष शितल गायकवाड,माधुरी कोठुळे,उज्वला वनवे,सरिता नाईकवाडे,जिल्हाध्यक्ष संजय राठोड,उपाध्यक्ष श्रीमती संगीता आदमाने,योगेश सोळसे,बापू धनवे,तानाजी सोनवणे,आशा घेतल,अंकुश नागरगोजे,विकास घोडके, अमोल राठोड,आशा भारती, खाडे,उषा लोंढे हे उपस्थित होते.

# सुशांत दशरथ खैरमौडे यांना भोई समाज रत्न पुरस्कार

## तिरूपती येथील अधिवेशनात गौरव



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**येथील सामाजिक कार्यकर्ते सुशांत दशरथ खैरमोडे यांना भोई समाज रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.१८ व १९ जानेवारी रोजी तिरूपती बालाजी(आंध्रप्रदेश)येथे झालेल्या राष्ट्रीय प्रथम अधिवेशनात अखिल भारतीय भोई समाज सेवा संस्थेच्या माध्यमातून त्यांची पुरस्कारांसाठी निवड करण्यात आली.**

याप्रसंगी राष्ट्रीय महासचिव श्री गजानन दादा साटोटे, राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. श्रीएकनाथ काटकर, राष्ट्रीय महाराष्ट्र समन्वयक भाई नानासाहेब लकारे, महाराष्ट्र सचिव श्री योगेश श्रीनाथअध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश श्री तुकाराम वानखेडे, कार्यअध्यक्ष श्रीसचिन जमदाडे, माऊली लांडगे सर, आदींच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात आले. दरम्यान,अखिल भारतीय भोई समाज संस्थेच्या अंबाजोगाई तालुकाध्यक्षपदी सुशांत दशरथ खैरमोडे यांची निवडही करण्यात आली.सुशांत खैरमोडे यांची अंबाजोगाई तालुकाध्यक्ष पदी झाल्याबद्दल बालाजी खैरमोडे,बालाजी भूजंगे, रमेश गहिरे,लक्ष्मण हुशारे, राजाभाऊ हुशारे,खंडू जमदाडे, प्रसाद खैरमोडे,संजय बारस्कर, दत्ता बारस्कर, गणेश भुजंगे,विष्णूदास खैरमोडे, लक्ष्मण घटमल,अंकुश बलाया आदींनी अभिनंदन केले व उपस्थित होते. सुशांत खैरमोडे यांचे समाजातील सर्वांशी स्नेहाचे संबंध असल्याने त्यांचे सर्वत्र अभिनंदन होतं आहे.

# महायुती विरोधात लढणाऱ्या उमेदवारांना पक्षप्रवेश देऊ नका-सतीश निर्वळ

**मंठा । प्रतिनिधी**

**महायुतीमध्ये सहभागी पक्षातील अधिकृत उमेदवाराविरोधात निवडणूक लढलेल्या विरोधी पक्षातील नेत्याला लगेचच भाजप, शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) या पक्षात प्रवेश दिला जाणार नाही असा निर्णय झाला असल्याची माहिती भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष तथा चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलेली असून, जर आत्ताच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये महायुती विरोधात निवडणूक लढलेल्या उमेदवाराला पक्षात घेतल्यास महायुतीला तडा जाण्याची शक्यता नाकारता येत नाही उपमुख्यमंत्री श्री एकनाथराव शिंदे उद्या जालना जिल्हा दौऱ्यावर असून या दौऱ्या दरम्यान परतूर विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढवलेले व जनतेने नाकारलेले दोन्ही उमेदवार शिवसेना शिंदे गटात प्रवेश करण्यात आलेली जोरदार चर्चा सुरू आहे. त्यामुळे महायुतीला तडा जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. असे मत भारतीय जनता पार्टी मंठा तालुका अध्यक्ष सतीशराव निर्वळ यांनी व्यक्त केले आहे.**



नुकत्याच झालेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीत महायुतीत सहभागी पक्षातील उमेदवाराविरोधात लढलेल्या विरोधी पक्षातील कोणत्याही नेत्याला पक्षात घेऊ नये अशी जालना जिल्ह्यातील पाचही आमदारांची मागणी असून स्थानिक आमदारांना विश्वासात न घेता यातील कोणत्याही व्यक्तीला पक्षप्रवेश देऊ नये असे सर्व आमदारांचे म्हणणे आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महायुती विरोधात निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना पक्षात प्रवेश देणार नाही या मुद्द्यावर शिक्कामोर्तब केलेले असताना उद्या एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत होणाऱ्या प्रवेशा संदर्भात जोरदार चर्चा सुरू असल्याची माहिती देखील सतीशराव निर्वळ यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात दिली आहे. महाराष्ट्रात भाजपा शिवसेना राष्ट्रवादी या महायुतीला २३२ जागा मिळालेल्या असून त्यातील एकट्या भारतीय जनता पक्षाला१३२ जागा मिळाल्या आहेत अशा परिस्थितीत महायुतीची सर्व बाजू भक्कम असताना ज्या उमेदवारांना जनतेने नाकारले उमेदवार पक्षात घेऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना काय साध्य करायचे आहे? असा सवाल देखील आता जनसामान्यांमध्ये केला जातो आहे. सर्वसामान्य जनतेने नाकारलेल्या लोकांना पक्षांमध्ये स्थान दिल्यास महायुतीच्या विरोधात जन आक्रोश निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे देखील सतीशराव निर्वळ यांनी म्हटले आहे.

# पिस्तोल फायरिंग प्रकरणी फरार आरोपी पकडला

अंबड। प्रतिनिधी

अंबड शहरांमध्ये एका जणाला जीवे मारण्यासाठी पिस्तोलने फायरिंग केली होती या प्रकरणी एक महिन्यापासून आरोपी पळून गेला होता याप्रकरणी अखिर पोलिसांनी शोध लावून आरोपी पकडला याप्रकरणी सविस्तर माहिती अशी की दिनांक २३/१२/२०२४ रोजी रात्री ०९-३० वाजताच्या सुमारास संत कैकाडी महाराज चौक, अंबड-पाचोड रोडवर, अंबड येथे फिर्यादी किशोर गायकवाड, वय ३५ वर्षे, व्यवसाय हॉटेल चालक, राहणार- शिंदेनगर, अंबड या व्यक्तीला आरोपी गणेश खरात राहणार अंबड हा आरोपी म्हणाला की हॉटेल चालविण्यास का घेतली याकारणाने पिस्टलने फायरिंग करुन बिर्याणी



किशोर गायकवाड यांना जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला म्हणुन अंबड पोलीस ठाणे येथे गुरन ५७३/२४ कलम १०९,३५२,३५१(०३) भारतीय न्याय संहिता सह कलम ०३/२५ भारतीय हत्यार कायदा प्रमाणे दिनांक २४/१२/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

नमुद गुन्हयातील आरोपीच्या अंबड पोलीस मागावर होते, दिनांक २४/०१/२०२५ रोजी १४-०० वाजताच्या सुमारास नमुद गुन्हयातील आरोपी गणेश बाबुराव खरात हा अंबड येथे येत असल्याची गोपनिय माहिती मिळाल्याने अंबड पोलीस पथक आरोपीचा शोध घेण्यासाठी आरोपीच्या घराकडे येणाऱ्या रस्त्यावर सापळा रचला. नमुद आरोपी हा माडीरोडने येत असतांना तुळजाभवानी माता मंदीराजवळ गुन्हयात वापरलेल्या मोटार सायकलसह ताब्यात घेवुन आरोपीला अटक करण्यात आलेली आहे. सदरची कामगीरी मा पोलीस अधिक्षक श्री. अजय कुमार बन्सल , उपविभागीय पोलीस अधिकारी श्री विशाल खांबे , अंबड पोलीस ठाणे प्रमुख पोलीस निरीक्षक श्री सतिश जाधव यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे अंबडचे पोलीस अधिकारी सपोनि श्री अमोल गुरले, पोउपनि भगवान नरोडे, पोहेका १११८/विष्णु चव्हाण, पोहेका १२७२/दिपक चव्हाण व पोकों ३४४/अरुन मुंढे यांनी कारवाई केली

# राष्ट्रीय मतदार दिनी भाजपा व निवडणूक आयोगाचा निषेध करणार

## नाना पटोले यांची घोषणा, लोकशाही वाचवण्यासाठी काँग्रेसचा एल्गार




**मुंबई । प्रतिनिधी**

**भारतीय जनता पक्ष व निवडणूक आयोगाने विधान सभेच्या निवडणुकीत मतांवर दरोडा टाकून लोकशाहीचा गळा घोटला आहे. भाजपा व निवडणुक आयोगाची ही अभद्र युती लोकशाहीला कलंक लावणारी आहे. लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी तसेच मतदारांच्या हक्कासाठी काँग्रेस पक्ष शनिवारी दि.२५ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिनी राज्यभर जिल्हा व तालुका स्तरावर तीव्र आंदोलन करणार असल्याची माहिती काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली.**

पत्रकारांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, विधानसभा निवडणुकीत भाजपाने निवडणुक आयोगाच्या मदतीने घोटाळा केला. लोकसभा निवडणुकीनंतर सहा महिन्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत ५० लाख मतदार कसे वाढले? मतदानाच्या दिवशी संध्याकाळी ५ नंतर रात्रीच्या अंधारात ७६ लाख मतदान कसे वाढले? याचे पुरावे निवडणूक आयोग देत नाही. राज्यात आलेले सरकार आपल्या मताचे नाही, अशी जनभावना निर्माण झाली असून मतदान मतपत्रिकेवरच घ्यावे अशी मागणी जनतेतूनच येत आहे. लोकशाही अबाधित ठेवण्यासाठी निवडणूक आयोगाचा भ्रष्ट कारभार थांबला पाहिजे, निवडणूका या निष्पक्ष, पारदर्शक व भयमुक्त वातावरणात पार पाडल्या पाहिजेत यासाठी काँग्रेस राष्ट्रीय मतदार दिनी दिवशी रस्त्यावर उतरून आंदोलन करणार असल्याची माहिती त्यांनी दिली. या आंदोलनात काँग्रेस पक्षाचे नेते, आमदार, खासदार, माजी आमदार, खासदार, जिल्हा पदाधिकारी, विभाग व सेलचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

## पान १ वरून...

### सोयाबीनची

पण नविन मुदतवाढ देताना सरकारने जिल्ह्यांना नविन खरेदीचे उद्दीष्ट दिले होते. जिल्हानिहाय खरेदीचे उद्दीष्ट दिल्याने आता मात्र शेतकऱ्यांची अडचण होत आहे. कारण काही जिल्ह्यांमध्ये खरेदीला वेग आल्याने उद्दीष्ट पूर्ण झाले. त्यामुळे खरेदी थांबावावी लागली. अनेक जिल्ह्यातील केंद्रांवर शेतकरी गाड्या घेऊन खरेदीची वाट पाहत आहेत. इतरही काही जिल्ह्यांमध्ये खरेदी उद्दीष्टाच्या जवळ पोहचल्याचे समोर आले आहे. देशातील खरेदीची तुलणा केली तर सोयाबीन खरेदीत महाराष्ट्रात सर्वाधिक खरेदी झाली आहे. महाराष्ट्रात ७ लाख २८ हजार टन खरेदी झाली. तर मध्य प्रदेशात ६ लाख २२ हजार टनांची खरेदी झाली. मध्य प्रदेशातील खरेदी २ जानेवारीलाच बंद झाली. आता केवळ महाराष्ट्र आणि राजस्थानमध्ये खरेदी सुरु आहे. राजस्थानमध्ये खरेदीसाठी ८ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

-----------

### धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याबाबत

आरोपी फरार आहे. वाल्मिक कराडवर देखील मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची देखील मागणी होत आहे. यावर बोलताना राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते आमदार विक्रम काळे यांनी मोठे वक्तव्य केले आहे.

-----------

### पीएम किसानचा १९ वा हप्ता

आखणी केली जात आहे, असे राजकीय विश्लेषक सांगतात. केंद्र सरकार पीएम किसान योजनेतून देशभरातील अल्पभूधारक शेतकऱ्यांना दरवर्षी ६ हजार म्हणजे महिन्याला ५०० रुपये देते. त्याचे वितरण तीन टप्प्यात केलें जाते. प्रत्येक टप्प्यात २ हजार रुपये शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर डीबीटीमार्फत जमा केले जातात. या योजनेतून २०१९ मध्ये पहिल्या हप्त्याचा ३.४६ कोटी शेतकऱ्यांना लाभ देण्यात आला होता. तर १८ व्या हप्त्याचा लाभ देशभरातील ९ कोटी शेतकऱ्यांना देण्यात आला आहे.

--------------

### एसटी बसचा प्रवास

होऊन त्यात हा निर्णय घेण्यात आला. डिझेल, चेसिस आणि टायरच्या वाढत्या किमती, कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यावरील खर्चाचा हवाला देत दरवाढीचा निर्णय घेण्यात आला. यापूर्वी २६ ऑक्टोबर २०२१ रोजी एसटीच्या प्रवासी भाड्यात वाढ करण्यात आली होती. नवी भाडेवाढ हकीम समितीच्या शिफारशींच्या आधारे करण्यात आली आहे. नवीन भाडे दर २४ जानेवारी २०२५ रोजी मध्यरात्रीपासून लागू होतील आणि २५ जानेवारीपासून पूर्णपणे लागू होतील. सुधारित भाडे मानक बसेस, एक्सप्रेस सेवा, स्लीपर बसेस आणि वातानुकूलित बसेससह विविध प्रकारच्या सेवांना लागू होईल. नियमित बसमधील ६ किमी प्रवासाचे भाडे ८.७० रुपयांवरून १०.०५ रुपयांपर्यंत वाढेल, इतर सेवा प्रकारांसाठी आताच्या भाड्याच्या प्रमाणात वाढ होईल.

----------

### महादेव मुंडे प्रकरणाचा

तपास गुन्हे शाखेकडे द्या, अशी मागणी धस यांनी केली आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या प्रमुखांना वगळून केस द्या असेही सुरेश धस यांनी म्हटले आहे. गेल्या १५ महिन्यांपूर्वी परळीत महादेव मुंडे यांचा खून झाला. या खूनाचा अद्याप तपास लागला नाही. याचे कारण म्हणजे परळी पोलीस ठाण्यात बहुतेक अधिकाऱ्यांपासून ते कर्मचाऱ्यांपर्यंत सर्वांना आकानेच निवडलेले आहे, असा थेट आरोपच सुरेश धस यांनी केला. पुढे ते असेही म्हणाले, महादेव दत्तात्रय मुंडे यांच्या हत्या प्रकरणाचा तपास एलसीबीकडे देण्यात यावा, अशी मागणी आ. सुरेश धस यांनी पोलिस अधिक्षकांकडे केली. परळीतील सर्व पोलिस अधिकारी, कर्मचारी हे आकानेच बसवले आहेत. त्यामुळे महादेव मुंडे खून प्रकरणात तपास करीत नाहीत, असे सांगून वाल्मिक कराड यांचे चिरंजिव सुशिल कराड व श्री कराड या दोन मुलांनी ६ मोबाईल नंबरवरुन परळीच्या पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांना फोन केले गेले. याची मुंबईहून आलेल्या सायबर तज्ञ दुबे यांनी तपासून निष्पन्न केले आहे, असेही धस म्हणाले.

**बल्लाळदेव म्हणत पोलिसांवर हल्लाबोल**

शहर पोलिस ठाण्याचे प्रभारी शितलकुमार बल्लाळ आणि वाल्मिक कराड यांच्यातील फोन कॉल रेकॉर्डिंग व्हायरल झाल्याने एकच खळबळ उडाली. यावर बोलताना आ. धस म्हणाले, बल्लाळदेव प्रभासच्या पिक्चरमध्ये होता एक बल्लाळदेव, मिस्टर बल्लाळदेव सारखे असे वागले म्हणून पोलिस खाते बदनाम झाले असल्याचे सांगून बीडच्या पोलिस यंत्रणेवर हल्लाबोल केला.

---------------

### जिल्हाधिकारी जिल्हाधिकारी कार्यालयात

शासननिर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यामुळे नागरीकांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या प्रकरणांची माहिती त्यांच्याच जिल्ह्यात उपलब्ध होणार आहे. तसेच नागरीकांची वेळ व पैशाचा अपव्यय टाळता येईल. संबंधित जिल्ह्यातील मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षास प्राप्त झालेल्या अर्जांची सद्यस्थिती नागरिकांना उपलब्ध करुन देणे व समस्यांचे निराकरण करणे, कक्षामध्ये आलेल्या रुग्णांना नातेवाईकांना अर्ज भरण्यास सहाय्य करणे, मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून आर्थिक मदत झालेल्या रुग्णांची रुग्णालयात जाऊन भेट घेणे, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाबाबत जनजागृती आणि प्रसिध्दी करणे, जिल्ह्यातील आपत्तीच्या ठिकाणी भेटी देणे तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामार्फत अर्थसहाय्य देण्याकरिता आजारांचे पुनर्विलोकन करणे व अर्थसाहाय्याची रक्कम नव्याने निर्धारित करणे याकरिता राज्यातील तज्ञ डॉक्टरांची समिती स्थापन करण्यात आली आहे. यामुळे अर्थसहाय्य देण्यात येणाऱ्या आजारांच्या संख्येत वाढ करण्यात येणार असून शासनाच्या इतर योजनेस समाविष्ट असलेले आजार वगळण्यात येणार आहेत. उपचारांचा खर्च दिवसेंदिवस वाढत असून अर्थसाहाय्याच्या रकमेचा देखील समितीमार्फत आढावा घेण्यात येणार आहे, असे मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख नाईक यांनी सांगितले.

-------------

### येत्या पाच वर्षांत घरगुती विजेचे

ग्राहकांचे वीज दर ७ रु. ६५ पैशापासून (प्रती युनिट) ५ रु. ८७ पैसे पर्यंत म्हणजेच २३ टक्क्यांनी कमी होतील तर १०१ ते ३०० युनिट वापर करणाऱ्या घरगुती ग्राहकांचे दर सरासरी १३.४९ रु. प्रति युनिट रु.११.८२ पर्यंत म्हणजेच १२ टक्क्यांनी कमी होतील, अशी आशा व्यक्त करत औद्योगिक ग्राहकांसाठीच्या सर्व सवलत, प्रोत्साहन योजना चालू ठेवण्यात येतील तसेच औद्योगिक ग्राहकांना क्रॉस सबसिडी देण्याची गरज पडणार नसल्याची माहितीही दिली. पुढे बोलताना विश्वास पाठक यांनी सांगितले की, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० चे अनेक फायदे पुढील पाच वर्षांत ग्राहक आणि महावितरणला होणार आहेत. महावितरण चा सरासरी वीज पुरवठ्याचा दर सध्याच्या ९ रु. ४५ पैसे या दरावरून २०२९-३० पर्यंत ९ रु. १४ पर्यंत खाली येणार असल्याचेही यावेळी सांगितले.

## शासकीय रेखाकला परीक्षेत सावरी मंत्री राज्यात पाचवी

अंबाजोगाई । प्रतिनिधी



महाराष्ट्र शासनाच्या तंत्र शिक्षण विभाग व कला संचालनालय मुंबईच्या वतीने घेण्यात येणाऱ्या शासकीय ग्रेड चित्रकला (इंटरमेजिएट)परीक्षेत योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित श्रीमती गोदावरीबाई कुंकूलोळ योगेश्वरी कन्या विद्यालयातील विद्यार्थिनींनी घवघवीत यश संपादन करून यशाची परंपरा राखली आहे या चित्रकला परीक्षेत सावरी मंत्री हिने महाराष्ट्र राज्यातून पाचवा क्रमांक मिळविला असून ए ग्रेड मध्ये २५ तर बी ग्रेड मध्ये ७१ विद्यार्थिनींनी मानांकन प्राप्त केले आहे या विद्यार्थिनींना चित्रकला शिक्षक डी.आर.बनसोडे यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थिनींच्या यशाबद्दल योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर, पदाधिकारी जी.बी.व्यास, अॅड. जगदीश चौसाळकर, कमलाकर चौसाळकर, डॉ.शैलेष वैद्य,प्रा.भीमाशंकर शेटे, डॉ.जयश्री देशपांडे, ऍड.कल्याणी विर्धे यांच्यासह शालेय पदाधिकारी,कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार, दि. २५ जानेवारी २०२५



# शासन दरबारी रस्सीखेच स्पर्धेसाठीच्या आरक्षणासाठी पाठपुरावा करू -अॅड. तांदळे

**बीड । प्रतिनिधी**

शासन दरबारी रस्सीखेच ह्या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या खेळाडू आरक्षणासाठी आपण प्रयत्न करू असे मत अॅड.सर्जेराव तात्या तांदळे यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाअंतर्गत, क्रीडा व युवक संचानलाय महाराष्ट्र राज्य पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय जिल्हा क्रीडा परिषद बीड यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित विनाअनुदानित खेळांच्या जिल्हास्तर शालेय रस्सीखेच क्रीडा स्पर्धाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.रस्सीखेच क्रीडा स्पर्धा ही अतिशय अटीतटीची स्पर्धा आहे. रस्सीखेच हा खेळ पारंपारिक आणि जुना आहे परंतु आज कालच्या आधुनिक युगात या खेळाकडे दुर्लक्ष होत चालले आहे तरी आजही ग्रामीण तसेच शहरी भागात या खेळाकडे विद्यार्थ्यांचा कल वाढलेला आहे हे या स्पर्धेत दिसून येत आहे. विद्यार्थ्यांना चपळ आणि मजबूत शरीर यष्टी बनवण्याचे काम या खेळातून होते. शासनाकडे जे खेळाडू काही निवडक खेळातून पुढे जातात त्यांना सरकारी नोकरीच्या माध्यमातून पाच टक्के आरक्षण असते त्यामध्ये रस्सीखेच हा खेळ नाही परंतु ह्या खेळासाठी आपण शासन दरबारी पाठपुरावा तर करूच आणि हा खेळ अधिक वृद्धिंगत कसा



होईल याकडे आपण सर्व लक्ष देऊ असे मत अॅड. तांदळे यांनी व्यक्त केले. आपला बीड जिल्हा हा जसा ऊस तोडणी कामगारांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो तसेच हा बीड जिल्हा खेळाडू बनवण्याची एक खाणच आहे हे मागील काही दिवसात कळून आले आहे. अविनाश साबळे, राहुल आवारे, सचिन धस तसेच नुकत्याच संपन्न झालेल्या खो-खो वर्ल्ड कप मध्ये आपल्या बीड जिल्ह्याची लेक कु.प्रियंका इंगळे ह्या सर्वांनी आपल्या बीड जिल्ह्याचे नाव जगाच्या पाठीवर कोरले आहे. या सर्वांची प्रेरणा घेऊनच आपण समोर बसलेल्या विद्यार्थी विद्यार्थिनींनी मोठ्या प्रमाणात मेहनत करून आपल्या बीड जिल्ह्याचे नाव उंचवावे असे त्यांनी मनोगतात व्यक्त केले. माणूस हा मातीशी जोडला तो कितीही उंच झाला कितीही मोठा झाला तरी त्याची नाळ आपल्या माणसाशी आणि आपल्या मातीशी जोडलेली असते हीच एका चांगल्या खेळाडू ची ओळख आहे. आजच्या आधुनिक युगात तरुण पिढी विद्यार्थी मोबाईल कडे ऑनलाइन गेमिंग कडे जास्त प्रमाणात वळले आहेत परंतु मोबाईल हा फक्त काही चांगल्या कामासाठीच विद्यार्थ्यांनी वापरला पाहिजे त्यांनी आपला जास्तीत जास्त वेळ अभ्यासाबरोबरच खेळायलाही दिला पाहिजे अभ्यासाने मन एकाग्र होते आणि खेळाने शरीर तंदुरुस्त होते जेव्हा आपले मन आणि शरीर हे दोन्ही मजबूत आणि तंदुरुस्त असतात तेव्हा आपण आपली छाप जगाच्या पाठीवर कुठेही टाकू शकतो. मी लवकरात लवकर रस्सीखेच हा खेळ खेळाडूंना मिळणाऱ्या खेळांमध्ये जे ५% आरक्षण आहे त्यामध्ये समाविष्ट करण्यासाठी शासन दरबारी प्रयत्न करणार आहे असे मत यावेळी अॅड.तांदळे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांसमोर केले. या झालेल्या स्पर्धेत १४ वर्ष वयोगटात(मुले) मध्ये प्रथम आयडियल इंग्लिश मीडियम स्कूल शिरूर कासार,१४ वर्ष वयोगट(मुली) मध्ये प्रथम सरस्वती साधना विद्यामंदिर आर्वी,शिरूर कासार.१७ वर्ष वयोगट(मुले) प्रथम श्रीकृष्ण माध्यमिक विद्यालय आष्टी. १७ वर्ष वयोगट(मुली) प्रथम आयडियल इंग्लिश मीडियम स्कूल शिरूर कासार.१९ वर्ष वयोगट(मुले) प्रथम के एस के महाविद्यालय बीड. १९ वर्ष वयोगट (मुली) प्रथम के एस के महाविद्यालय बीड ह्या सर्व विजेत्या टीम अभिनंदन सर्व उपस्थित मान्यवरांनी केले आणि त्यांना पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रम प्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी विद्यागर साहेब,प्रा.गोपाळ धांडे सर, भागचंद सानप सर, थोरात सर,शेलार सर,गिरी सर ,अमर सानप,सचिन तिपटे, क्रीडा विभागाचा संपूर्ण स्टाफ व जिल्ह्यातून आलेले स्पर्धक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान ६ वरुन...

### बीडनजीक होणारा उड्डाणपूल

निघाल्या होत्या. परंतु हे उड्डाणपुलाचे काम ३ पदरी होणार असल्याचे विभागाकडून सांगण्यात आले. त्यातही अनेक त्रुटी होत्या. त्यामुळे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्या कानावर हा प्रकार घातला. त्यांच्या माध्यमातून अजितदादा पवार यांच्यासमोर हा प्रश्न मांडला. त्यानंतर सुचनेची दखल घेऊन त्यांनी संबंधित विभागांच्या अधिकार्यांना योग्य त्या सर्व सुधारणा करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे आता उड्डाणपुलाच्या कामात मोठा बदल होणार असून ३ पदरीऐवजी ६ पदरी उड्डाणपूल दोन्ही बाजूने उभारण्यात येणार आहे. तसेच, प्रस्तावित तीन ठिकाणीच स्लीप रोड होणार आहे. या नवीन बदलाच्या अनुषंगाने शासनाकडून कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

**भविष्यातील वाहतूक कोंडीची समस्या लक्षात घेऊन नवा बदल**

भविष्यातील वाहतूक कोंडीची समस्या लक्षात घेऊन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मांडलेली सूचना कौतुकास्पद आहे. या सुचनेची दखल घेऊन राज्य शासनाने योग्य ती पाऊले उचलण्यास सुरुवात देखील केली आहे. या कामाबद्दल अजितदादा पवार, धनंजय मुंडे यांचे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी आभार मानले आहेत.

### दिव्यांग मतदार बांधवांनी

शाळा या ठिकाणी राष्ट्रीय मतदार दिवसाचे अनुषंगाने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. यामध्ये विद्यार्थ्यांची रॅली, रांगोळी, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, प्रश्नोत्तर स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, गायन स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, मतदार जनजागृती स्लोगन आदींचे आयोजन करण्यात आलेले असून या सर्व उपक्रमात दिव्यांग नवमतदार बंधू - भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहभाग नोंदवावा.

दि. २५ जानेवारी २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय बीड च्या वतिने जिल्हास्तरावर सकाळी ८ - ३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथून छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय बीड या मार्गावर भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आलेले आहे. तसेच सकाळी ११ वाजता राष्ट्रीय मतदार दिनाचा मुख्य कार्यक्रम जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवन सभागृहात मा. जिल्हाधिकारी अविनाश पाठक, मा. उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.

तरी जिल्ह्यातील सर्व दिव्यांग मतदार बंधूनी आपआपल्या सोईनुसार आपल्या तालुक्याच्या ठिकाणी तहसिल कार्यालयात उपस्थित राहून राष्ट्रीय कार्यास हातभार लावावा व १८ वर्षे पूर्ण झालेल्या दिव्यांग बंधूंची मतदार यादीत नोंद करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे व ज्यांचे मतदार यादीत नाव आहे त्यांना भविष्यात होणाऱ्या निवडणूकीत मतदान करण्यास प्रोत्साहीत करावे असेही शेवटी राजेंद्र लाड यांनी म्हटले आहे.

### एकात्मिक पीक व्यस्थापनाद्वारे

शिबीर, अवजारे सेवा केंद्र इत्यादी घेतलेल्या प्रात्यक्षिकांसह राजेवाडी गावामध्ये झालेल्या शेती कामाची माहिती दिली. एकूण ३४ शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्रावर रब्बी हंगामामध्ये हरभरा पीक प्रात्यक्षिके घेण्यात आल्याची माहिती दिली. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ.सांगळे यांनी हरभरा पिकांचे नुकसान टाळण्यासाठी शेतामध्ये इंग्रजी ''टी'' आकाराचे प्रति एकरी २० पक्षी थांबे लावावेत, घाटे अळीच्या सर्वेक्षणासाठी प्रति एकरी २ कामगंध सापळे लावावेत, किडीने आर्थिक पातळी ओलांडल्यास इमामेक्टीन बेझोएट ५ टक्के -४.५ ग्रम प्रति १० लिटर पाणी याप्रमाणे फवारणी घ्यावी तसेच वन्यप्राण्यापासून संरक्षण करण्यासाठी गावपातळीवर सामुहिक झटका मशीनचे कुंपण करावे याबाबत माहिती दिली. यानंतर गावातील शेतकरी श्रीकिशन सुरवसे यांच्या हरभरा पीक प्रात्यक्षिक प्रक्षेत्रावर शास्त्रज्ञांनी भेट दिली. मनोगत व्यक्त करताना सुरवसे यांनी पारंपरिक पद्धतीने हरभरा लागवड व केंद्राच्या शास्त्रज्ञांनी प्रशिक्षणाद्वारे माती परीक्षण आधारित अन्नद्रव्य व्यवस्थापन, पेरणीपूर्वी बिजप्रक्रिया, सुधारित वाणांची निवड, एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन व वेळोवेळी शास्त्रज्ञ प्रक्षेत्र भेटीदरम्यान मार्गदर्शन केल्यामुळे हरभरा उत्पादकतेत सरासरी २० ते २५ टक्के वाढ होईल असा अंदाज व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निक्रा प्रकल्पाचे वरिष्ठ सह-संशोधक बालाजी बोबडे यांनी केले तर प्रतिक आजने यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### श्री संत वामनभाऊ महाराज

गडाचे मठाधिपती महंत गुरुवर्य ह भ प विठ्ठल महाराज यांच्या अध्यक्षतेखाली व सिद्धेश्वर संस्थांचे महंत ह भ प स्वामी विवेकानंद महाराज शास्त्री यांच्या उपस्थितीत संपन्न होतो. याप्रसंगी सहा ते आठ ह भ प रामायणाचार्य श्रीहरी महाराज खेडकर ,घाटशीळ पारगाव , आळंदी देवाची यांचे सुश्राव्य कीर्तन होणार आहे यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होईल यावर्षीचे महाप्रसादाचे अन्नदाते शरद लक्ष्मण केदार हे यजमान आहेत तेव्हा या महाप्रसादासह सर्व कार्यक्रमाचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा याप्रसंगी गायनाचार्य पिंपळगाव टप्पा, मानूर, वारणी, दहिवडी, शिरूर कासार या ठिकाणची राहणार असून मृदंगाचार्य सुशांत महाराज केदार, श्री संत वामनभाऊ महाराज यांच्यावरील गीत गायन कार्यक्रम गहिनीनाथ महाराज आघाव, मोहन महाराज सुरसे, विजयकुमार गाडेकर पाटील व समस्त टाळकरी मंडळी यांचा असेल तेव्हा या सर्व कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन या सोहळ्याचे निमंत्रक तथा आयोजक यांच्यावतीने करण्यात आले आहे

# जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची बदली व चौकशी करा - सचिन फोलाने

अंबाजोगाई प्रतिनिधी

जिल्हाधिकारी अविनाश पाठक हे मागील १५ वर्षांपासून बीड जिल्ह्यात तळ ठोकून आहेत. त्यामुळे त्यांची बीड जिल्ह्यातून तात्काळ बदली करून त्यांच्या कार्याची चौकशी करावी अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव सचिन फोलाने यांनी मुख्यमंत्र्यांना गुरूवार, दिनांक २३ जानेवारी २०२५ रोजी दिलेल्या निवेदनातून केली आहे. याप्रकरणी सरकारकडून तातडीने पावले उचलली जातील अशी अपेक्षा ही निवेदनात व्यक्त केली आहे.



राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव सचिन फोलाने यांनी महाराष्ट्राचे सन्माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना गुरूवार, दिनांक २३ जानेवारी २०२५ रोजी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, आपल्या महाराष्ट्र राज्याच्या प्रशासनात प्रामाणिकतेची आणि कार्यक्षमतेची परंपरा कायम राखण्यासाठी मी आपल्या निदर्शनास एक महत्त्वाचा विषय आणत आहे. बीड जिल्ह्याचे विद्यमान जिल्हाधिकारी श्री.अविनाश पाठक हे गेल्या १५ वर्षांपासून जिल्ह्यात विविध प्रशासकीय पदांवर कार्यरत आहेत. त्यांनी जिल्ह्यात उपजिल्हाधिकारी, पुरवठा अधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, तसेच बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या त्रिसदस्यीय प्रशासकीय मंडळामध्ये सदस्य म्हणून ही काम केले आहे. मात्र, त्यांच्या कार्यकाळात काही गंभीर बाबी समोर आल्या आहेत. ज्या प्रशासनाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करतात. श्री.पाठक हे वाल्मीक कराड यांचे निकटवर्तीय असल्याचे आरोप आहेत. प्रशासनातील महत्वाची कामे वाल्मीक कराड यांच्या माध्यमातून होतात, अशी चर्चा जिल्ह्यात सर्वत्र आहे. महसूल विभागातील कथित घोटाळ्यांमध्ये पाठक यांचा अप्रत्यक्ष सहभाग असल्याचे ही आरोप आहेत, ज्यामध्ये त्यांनी वाल्मीक कराड यांना पाठबळ दिले आहे. याशिवाय, बीड जिल्ह्यातील अनेक महसूल अधिकाऱ्यांना त्यांच्या आदेशानुसार वाल्मीक कराड यांचे निर्देश मानण्याचे मौखिक आदेश दिल्याचा आरोप होत आहे. एवढ्या गंभीर आरोपांनंतर ही, आजपर्यंत त्यांच्यावर कोणतीही चौकशी झालेली नाही. या बाबींमुळे जिल्ह्यातील सामान्य नागरिकांचा प्रशासनावरचा विश्वास हरवत चालला आहे. आपल्या कार्यक्षम नेतृत्वाखाली या प्रकरणाची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. श्री.अविनाश पाठक यांची बीड जिल्ह्यातून तात्काळ बदली करणे आणि त्यांच्या कार्याचा तपशीलवार अहवाल घेणे, ही या परिस्थितीवर उपाय ठरू शकते. आपल्या सरकारकडून या विषयात त्वरित पावले उचलली जातील, अशी अपेक्षा राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव सचिन फोलाने यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. सदरील निवेदनाच्या प्रती उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे आणि उपजिल्हाधिकारी अंबाजोगाई यांना ही देण्यात आल्या आहेत.

## एसटी महामंडळाचा मनमानी कारभार तपासणीमुळे प्रवाशांची गैरसोय

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील म्हसोबावाडी चौफुला येथे दि.२३ जानेवारी रात्री पाटोदा ते मुंबई जाणारी बस क्र.एम एच २० बी एल १३२७ ही एस टी महामंडळ यांच्या यंत्रामध्ये कार्यरत असणारे टी सी श्रेत्राने एक एक महिला प्रवाशी यांच्या कडुन लहान मुलांचे तिकिट नजर चुकीने गहाळ झाल्याने बीड एस टी डेपो अतंर्गत टि सी अधिकारी यांची कांबळे,जाधव, राठोड या अधिकाऱ्यांनी या महिलेवर चक्क नियमांचे उल्लंघन तोडत एका प्रवाशी महिलेचा अनादर करत मनमानी कारभार करत चक्क एक तास सर्व प्रवाशांना वेढीस धरले जे नियमावर बोट ठेवणारे अधिकारीच सिव्हिल ड्रेसवर ड्युटी करतात मग यांना हे चालतं का ...?अशा हिटलरी अधिकाऱ्यांकडे परिवहन मंत्री लक्ष कधी देतील असा सवाल गहुखेलचे समाजसेवक प्रविण शेकडे व सरपंच अशोक शेकडे यांनी उपस्थित केला एस टी महामंडळाचे ब्रीद वाक्य बहुजन हिताय बहुजन सुख असं आहे मग घरचं या वाक्या प्रमाणे एस टी महामंडळाचा कारभार चालतो का... ?हा प्रश्न सर्वसामान्य जनतेत पडु लागला आहे.

एस टी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता उडवाउडवीची उत्तरे दिली केली व दै.राज्य लोकतंत्र प्रतिनिधी प्रेम पवळ यांच्याशी अरे तुरेची भाषा वापरली गेली.

# बालविवाह मुक्त भारत रॅली संपन्न

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभाग विशेष वार्षिक शिबिर २०२४-२५ अंतर्गत दिनांक २२ जानेवारी २०२५ रोजी मौजे अंजनडोह या गावातून बालविवाह मुक्त भारत रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, विद्यार्थी-विद्यार्थिनी व नूतन माध्यमिक विद्यालय अंजनडोह येथील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग होता. या रॅलीमध्ये मुलांनी बालविवाह मुक्त भारत, सशक्त भारत अशा घोषणांनी संपूर्ण गावातील परिसर निनादला. त्यानंतर बौद्धिक सत्रांमध्ये प्रा. स्मिता बसोले, प्रा. नागोराव वाघमारे, प्रा. विनायक कापावार यांनी बालविवाह मुक्त भारत या विषयावर व्याख्यान दिले. दिनांक २३ जानेवारी २०२५ रोजी संपूर्ण गावातील स्वच्छता



फेरी काढून राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांच्या माध्यमातून संपूर्ण गावातील परिसराची स्वच्छता करण्यात आली. तसेच संपूर्ण गावातील प्लास्टिकच्या बाटल्या व इतर प्लास्टिक घनकचरा संकलित करून त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी ग्रामपंचायतीच्या ताब्यात देण्यात आले. संपूर्ण गावातील सार्वजनिक परिसराची विद्यार्थ्यांनी श्रमदानाच्या माध्यमातून स्वच्छता केली. या श्रमदानाच्या कार्यक्रमात गावातील सरपंच प्रमोद सोळंके, उपसरपंच प्रकाश सोळंके, ग्रामपंचायत सदस्य श्री. सुधीर सोळंके यांच्यासह गावातील इतर सर्व नागरिक व विद्यार्थी-विद्यार्थिनींनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. यावेळी रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ. दत्ता जाधव, डॉ. विजयकुमार कुंभारे, प्रा. बालासाहेब जोगदंड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारल्याबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे राजकिशोर मोदी यांनी केले अभिनंदन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद (पालकत्व) स्वीकारल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना अजित पवार यांना त्यांच्या मुंबई येथील कार्यालयात भेटून त्यांचे अभिनंदन केले आहे. यावेळी राजकिशोर मोदी यांच्यासमवेत कापूस पणन महासंघाचे संचालक ऍड विष्णुपंत सोळंके , अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेचे उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी हे उपस्थित होते.

राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना अजित पवार यांच्या मुंबई येथील कार्यालयात त्यांची राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकाऱ्यांनी भेट घेतली. या भेटीत त्यांनी बीड जिल्ह्याचे (पालकमंत्री पद ) पालकत्व स्वीकारल्याबद्दल ना. अजित पवार यांचे बीड जिल्हा तथा अंबाजोगाई वासीयांच्या वतीने



अभिनंदन केले. या भेटीदरम्यान अजित पवार व राजकिशोर मोदी यांच्यात बीड जिल्ह्यातील विविध विषयांवर चर्चा झाली. त्याचबरोबर अंबाजोगाई शहराच्या विकासासाठी आवश्यक अशा सर्व विषयावर देखील चर्चा करण्यात आली.

राजकिशोर मोदी व ना. अजित पवार यांच्या भेटीदरम्यान अजित पवार यांनी राजकिशोर मोदी हे मागील अनेक वर्षापासून करत असलेल्या राजकिय, सामाजिक, शैक्षणिक ,सांस्कृतिक तसेच बँकिंग क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल त्यांचे कौतुक केले. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व पक्षाची ध्येयधोरणे संपूर्ण महाराष्ट्रातील सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचवून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष बळकट करण्यासाठी प्रयत्न करावा अशा सूचना पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष या नात्याने अजित पवार यांनी राजकिशोर मोदी यांना दिल्या. राष्ट्रीय अध्यक्ष या नात्याने ना. अजित पवार यांनी दिलेल्या सर्व सूचनांचे पालन करत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष वाढीसाठी आपण सदैव प्रयत्न करू असे अभिवचन राजकिशोर मोदी यांनी ना. अजित पवार यांना याप्रसंगी दिले.

# तणावमुक्त परीक्षा कालखंडात आरोग्याबद्दल विशेष खबरदारी घ्या -प्रा.राजेंद्र आविळे

पाटोदा । प्रतिनिधी

उच्च माध्यमिक (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त (इ. १० वी) फेब्रुवारी-मार्च २०२५ कॉपीमुक्त अभियाना अंतर्गत जनजागृती सप्ताहास सुरुवात आज दि.२३ गुरुवार रोजी महिला कला व विज्ञान कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय पाटोदा येथे आयोजित करण्यात आले आहे. यावेळी प्राचार्य राजेंद्र आविळे विद्यार्थ्याला तणावमुक्त परीक्षा देण्यासाठी व या कालखंडात आरोग्याबद्दल विशेष खबरदारी घेण्याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य राजेंद्र आविळे तर प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे मुख्याध्यापक मधुकर बोखारे, दैनिक लोकमत ता.प्रतिनिधी तथा मराठी पत्रकार परिषदेचे



तालुकाध्यक्ष अजय जोशी, पत्रकार हमीदखान पठाण हे होते.

सदर दोन्ही परीक्षांना राज्यातून सुमारे ३१ लाख विद्यार्थी प्रविष्ट होणार असून सदर परीक्षेत विविध मार्गांनी निष्पन्न होणा-या गैरप्रकारांचा मंडळाला सातत्याने सामना करावा लागतो त्यादृष्टीने राज्यातील नऊ विभागीय मंडळे आपआपल्या स्तरावर विविध उपाययोजना व उपक्रम राबवित असतात, त्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवसांचा कृती आराखडा कार्यक्रमा अंतर्गत,मा. शिक्षणमंत्री दादासाहेब भुसे याच्या मार्गदर्शनाखाली आगामी फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या इ. १० वी व इ. १२ वी परीक्षेचे वेळी राज्यातील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये दिनांक २० जानेवारी ते दिनांक २६ जानेवारी २०२५ या कालावधीत कॉपीमुक्त अभियाना अंतर्गत जनजागृती सप्ताह आयोजित करण्यात आलेला आहे. सदर सप्ताह आयोजित करणे संदर्भात आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी, शिक्षण निरीक्षक व सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना कॉपीमुक्त अभियानाअंतर्गत जनजागृती सप्ताह आयोजित करण्यात आले.त्या आदेशानुसार पाटोदा येथील महिला महाविद्यालय,संत बाळुदेव महाराज विद्यालय पाटोदा येथे प्रथम काफीमुक्त मार्गदर्शन विद्यार्थ्यांना करण्यात आले.प्रा.गर्जे मडम, येवले मडम, कोल्हे मडम उपस्थित होते.यावेळी प्रस्ताविक प्रा.विजय जावळे तर सुत्रसंचलन अंकुश नाईकनवरे यांनी केले

## सामाजिक ऐक्यासाठी बालविवाह पद्धत बंद करा-सभापती काळे

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष हिवाळी शिबिर मोठे बांगरवाडी येथे संपन्न या शिबिराचा समारोप समारंभ २३ जानेवारी रोजी संपन्न झाला या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉक्टर विश्वास कदम महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक सोमनाथ घाडगे सर प्रमुख पाहुणे म्हणून पाटोदा सभापती माननीय सौ अश्विनीताई हनुमंत काळे हरिभक्त पारायण लक्ष्मण सस्ते हरिभक्त पारायण दादा महाराज आरसूळ सामाजिक कार्यकर्ते साजिद भाई एक बालपेंटर माजी प्राचार्य डॉक्टर सुनील जाधव इंग्रजी विभाग प्रमुख प्राध्यापक विनोद कीर्तन जेष्ठ प्राध्यापिकासव कल्पना घारगे उपस्थित होत्या सर्वप्रथम मान्यवरांचा सत्कार करून या कार्यक्रमाचे प्रस्ताविक शिबिराचा अहवाल डॉक्टर शिवाजी काकडे यांनी सादर केला यानंतर आपले मनोगत



व्यक्त करताना सभापती अश्विनीताई काळे यांनी सामाजिक रूढी परंपरा दूर ठेवून सामाजिक ऐक्य साधण्यासाठी बालविवाहाची पद्धत बंद केली पाहिजे असे युवकांना आव्हान केले तर सामाजिक कार्यकर्ते साजिक भाई सय्यद यांनी विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञानाबद्दल माहिती दिली तर हरिभक्त पारायण लक्ष्मण महाराज सस्ते यांनी अज्ञानातून सज्ञान होण्यासाठी ज्ञानाचा अंगीकार केला पाहिजे असे आवाहन विद्यार्थ्यांना केले या कार्यक्रमात प्राचार्य प्राध्यापक सोमनाथ घाडगे यांनी या शिबिराबद्दल गावकर यांचे राष्ट्रीय सेवा योजना विभागातील कार्यक्रमाधिकारी स्वयंसेवक यांनी उत्तम कार्य केल्याबद्दल अभिनंदन केले गावकऱ्यांचे आभार मानले यानंतर या कार्यक्रमाचे आभार सामाजिक कार्यकर्ते व सहशिक्षक ईश्वर काळे यांनी मांडले कार्यक्रमाचे संचलन कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक डॉक्टर लोखंडे बीबी यांनी केले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक प्रवीण शिरेदार डॉक्टर संदीप घाडगे यांनी सहकार्य केले सकाळी स्वयंसेवकाच्या वतीने बालविवाह प्रतिबंध करण्यासाठी गावातून रॅलीचे आयोजन करण्यात आले यारलेल्या बहुसंख्य स्वयंसेवक उपस्थित होते यानंतर पर्यावरण संवर्धनासाठी महाविद्यालयाच्या वतीने या गावच्या नदीत १०० मीटरचा बंधारा बांधून गावकऱ्यांसाठी पाणी साठण्याची व्यवस्था केली. शेतकऱ्यांना त्याचा उपयोग होणार आहे हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गावातील नागरिक महिला युवक महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉक्टर अशोक देवगुडे प्राध्यापक नाटककार प्राध्यापक बाप्पू भोकसे प्राध्यापक रामकृष्ण प्रधान प्राध्यापक जोशी सर प्राध्यापक बोरे सर कनिष्ठ विभागाचे विभाग प्रमुख प्राध्यापक सतीश जरांगे सरकेशव सुर्वे श्री कुणाल काळे विशाल काळे महादेव काळे अरुण काळे उमाजीराव काळे विशाल काळे सतीश गर्जे सिद्धेश्वर काळे संदीप शिंगाडे दत्ता काळे यांनी सहकार्य केले राष्ट्रगीताने शिबिराचे सांगता झाली.

# राज्यात होणार ड्रोन दीदी योजनेची अंमलबजावणी

## महिला बचत गटांना ८ लाख रुपयांची मिळणार आर्थिक मदत

मुंबई : नमो ड्रोन दीदी योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय समिती स्थापन करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. नमो ड्रोन दीदी योजनेतून महिला बचत गटांना ८० टक्के अनुदानावर ड्रोन उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. महाराष्ट्रात या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाने एप्रिल २०२४ रोजीच राज्य सरकारला पत्र पाठवलं होतं. परंतु त्यावर राज्य सरकारने कार्यवाही केली नव्हती. अखेर आता समिती स्थापन करून राज्यात योजना राबवण्याच्या दिशेनं पाऊल टाकलं आहे. त्यामुळे राज्यातील महिला बचत गटांना ड्रोन मिळणार आहेत.

केंद्र सरकार पुरस्कृत दिनदयाल अंत्योदय योजना, राष्ट्रीय ग्रामीण जीवन्नोती मिशन अंतर्गत महिला बचत गटांना ड्रोन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. द्रव खत आणि किटकनाशकांच्या फवारणीसाठी भाड्याने ड्रोन महिला चालवू शकतात. त्यातूनं आर्थिक सक्षमीकरणाला गती देता येऊ शकते, यासाठी केंद्र सरकारने नमो ड्रोन दीदी योजना सुरू केली आहे. या योजनेतून २०२४-



२५ ते २०२५-२६ या आर्थिक वर्षात देशातील १४ हजार ५०० निवडक महिला बचत गटांना ड्रोन देण्यात येणार आहेत. त्यासाठी केंद्र सरकारने १ हजार २६१ कोटी निधी उपलब्ध करून दिला आहे. तसेच या योजनेतून महिला बचत गटांना ड्रोन खरेदी व इतर साहित्यासाठी ८० टक्के दराने जास्तीत जास्त ८ लाख रुपयांपर्यंत आर्थिक सहाय्य केंद्र सरकार करणार आहे. याची योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी आता राज्य सरकारने राज्य स्तरीय समिती स्थापन करण्यासाठी मान्यता दिली आहे. या समितीचे अध्यक्ष राज्याचे अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/कृषी विभाग सचिव असतील. तर एकूण १० सदस्यीय समितीमध्ये विविध स्तरातील अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. या समितीकडून ड्रोनची सुविधा प्रभावीपणे राबवण्यासाठी लागवडीखालील क्षेत्राची निवड करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. तसेच लाभार्थी गटाची निवड. ड्रोन पायलट आणि ड्रोन सहाय्यक प्रशिक्षणासाठी सदस्याची निवड करणे आदि जबाबदारी सोपवण्यात आली आहे. नमो ड्रोन योजनेतून महिलांना दरवर्षी किमान १ लाख रुपये मिळू शकतात. त्यामुळे महिलांचं जीवनमान सुधारू शकेल, असा दावा केंद्र सरकारकडून करण्यात येत आहे. तसेच शेती क्षेत्रातील महिलांच्या कौशल्याचा विकास होऊन रासायनिक खत आणि किडनाशकांचा योग्य प्रमाणात वापर करता येऊ शकेल, असाही केंद्र सरकारचा विश्वास आहे. २०२४ मार्च महिन्यात या योजनेतून १ हजार ड्रोनचं महिलांना पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते वाटप करण्यात आलं आहे. दरम्यान, देशातील ३ कोटी महिलांना लखपती दीदी करण्याचे लक्ष्य केंद्र सरकारनं ठेवलं आहे. त्याचा एक भाग म्हणजे नमो दीदी ड्रोन योजना आहे.

## काढणी, मळणी, साठवण योग्य केली तर मिळेल चांगला फायदा

सोयाबीन लागवड करण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. याबरोबरच देशातील सोयाबीनचे उत्पादनही मागील काही दिवसांत मोठ्या प्रमाणावर वाढल्याचे पाहायला मिळाले आहे. असे असले तरी प्रत्यक्षात मात्र सोयाबीनची उत्पादकता कमी झाल्याचे अभ्यासकांचे म्हणणे आहे. म्हणजे पूर्वी एकरी जितका सोयाबीन निघायचा त्याप्रमाणात आता कमी निघत आहे. सोयाबीनचे अयोग्य नियोजन अन काढणी, मळणी, साठवण तंत्र यातील चुका सोयाबीनची उत्पादकता कमी होण्यास कारणीभूत आहे. अनेकदा सोयाबीन काढण्यास शेतकऱ्यांना उशीर होतो अन परिणामी त्याचा सोयाबीन उत्पदादानावर परिणाम होऊन उत्पादन घटते.

काढणी : सोयाबीन पीक पेरणीनंतर साधारणतः ९५ ते १०५ दिवसांत काढणीसाठी तयार होते. पीक परिपक्व झाल्यानंतर पिकाची काढणी लवकर करणे फार महत्त्वाचे आहे. योग्य वेळी काढणी न केल्यास शेंगा तडकून उत्पादनात १५ ते २० टक्के घट येते. पीक परिपक्व झाल्यानंतर ८५ ते ९० टक्के पाने देठासहित गळून पडतात. शेंगांचा रंग पिवळा ते काळसर होऊ लागतो. सोयाबीनचे उत्पादन आणि प्रत चांगली राखण्यासाठी पावसाचा अंदाज घेऊन पिकाची काढणी करावी. कारण, बियाणाला पक्वतेनंतर किंचित ओलावा लागला तरी बियाण्याची उगवणक्षमता कमी होते. बियाण्यातील ओलावा १४ ते १५ टक्के असताना कापणीला सुरवात करावी. वेळेवर कापणी केल्यास मळणीमध्ये बियांचे नुकसान होत नाही. पिकाची काढणी धारदार कोयत्याने जमिनीलगत कापून करावी. झाडे उपटून येणार नाहीत याची काळजी घ्यावी. काढणीनंतर सोयाबीनचे एकत्र ढीग किंवा गंजी करून ठेवू नये. यामुळे त्यास बुरशी लागून धान्याची प्रत खालावते. काढणी केलेले पीक उन्हामध्ये चांगले वाळवावे. मळणीसाठी उशीर होणार असेल तरच



वाळलेल्या सोयाबीनची गंजी करून ठेवता येईल.

मळणी : मळणी यंत्राने मळणी करताना बियाण्यातील आर्द्रता १४ टक्के पेक्षा कमी नसावी. मळणी यंत्राच्या फेऱ्याची गती प्रति मिनीट ४०० ते ५०० फेरे इतकी ठेवावी. बियाण्यातील आर्द्रतेचे प्रमाण १३ टक्के पर्यंत असेल तर मळणी यंत्राच्या फेऱ्याची गती ३०० ते ४०० फेरे प्रति मिनीट ठेवावी. मळणीवेळी अधूनमधून बियाण्यावर लक्ष ठेवावे. जेणेकरून त्याची डाळ होणार नाही. डाळ होण्याचे प्रमाण जास्त असल्यास वेग कमी करावा.

साठवण : मळणीनंतर बियाणांची योग्य ठिकाणी साठवण करणे गरजेचे आहे. योग्य रीतीने साठवण न केल्यास उगवणशक्तीवर विपरीत परिणाम होतो. साठवण करण्यापूर्वी बियाणे २ ते ३ दिवस उन्हामध्ये चांगले वाळवावे. साठवण करतेवेळी बियाण्यामध्ये ओलाव्याचे प्रमाण १० ते १२ टक्के पेक्षा जास्त असू नये. शक्यतो साठवणुकीसाठी पत्र्याच्या कणगीची वापर करावा. पोत्यामध्ये साठवण केल्यास, पोते जमिनीवर सरळ उभे न ठेवता फळीवर ठेवावे. प्रत्येक पोते ८० किलोपर्यंत भरलेले असावे. पोती एकावर एक रचताना ४ पेक्षा पोते एकावर एक ठेवू नयेत.

## पोल्ट्री उद्योगातून तरुणाची गगनभरारी

अलिकडच्या काळात अनेक तरुण व्यवसायाच्या माध्यमातून मोठी प्रगती करत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. आज आपण अशाच एका कुक्कुटपालन करणाऱ्या युवकाची यशोगाथा पाहणार आहोत. या युवकाने कुक्कुटपालनाच्या माध्यमातून लाखो रुपयांची कमाई केली आहे. सरकारी नोकरीसाठी प्रयत्न केले, मात्र, नोकरी मिळाली नाही. या स्थितीत नाराजन न होता नांदेड जिल्ह्यातील आशिष आडके या युवकाने कुक्कुटपालनाच्या माध्यमातून मोठा नफा मिळवला आहे. आशिष आडके आज अशा तरुणांसाठी प्रेरणास्थान आहे. ते सरकारी नोकऱ्यांसाठी तयारी करत होते. पण यशस्वी होऊ शकले नाहीत. त्यानंतर त्यांनी कुक्कुटपालनाचा व्यवसाय सुरु केला. यामाध्यमातून त्यांनी लाखो रुपयांची कमाई केली आहे. आशिषचे सरकारी नोकरीची परीक्षा उत्तीर्ण होऊन चांगली नोकरी मिळवण्याचे स्वप्न होते. पण नशिबात काहीतरी वेगळंच होतं. पुण्यात तीन वर्षे तयारी केली. मात्र यश न मिळाल्याने तो गावी परतला आणि कुक्कुटपालन सुरू केले.

आशिष आडके हा नांदेड शहरातील विजयनगर परिसरात कुटुंबासह राहतो. त्याने समाजशास्त्र आणि राज्यशास्त्रात पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण केली आहे. यानंतर स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून अधिकारी होण्याचे स्वप्न जोपासले. २०१५ मध्ये तो पुण्यात आला आणि स्पर्धा परीक्षांची तयारी करू लागला. मात्र, हे यश त्याच्यापासून दूर राहिले. त्यामुळे तो तीन वर्षांनी आपल्या गावी परतला.

खासगी नोकरी ऐवजी व्यवसाय निवडा

आशिषचे शिक्षण चांगले झाले होते. त्याला प्रोफेसरची नोकरी मिळत होती. मात्र, खासगी नोकरी करण्याऐवजी स्वत:चा व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय घेतला. पण नंतर कोरोना व्हायरसमुळे त्यांना दीड ते दोन वर्षे घरीच राहावे लागले. कोरोनाच्या काळात आशिषने मोबाईल फोनवर विविध व्यवसायांची माहिती मिळवली. तेव्हा आशिषच्या लक्षात आले की 'कुक्कुटपालन' हा कमी वेळेत जास्त पैसे मिळवून देणारा व्यवसाय आहे. त्यामुळेच त्यांनी हा व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय घेतला. घरातील काही पैसे आणि कुक्कुटपालनासाठी बँकेचे कर्ज घेऊन त्यांनी २०२३ मध्ये नांदेडजवळील एका शेतात कुक्कुटपालनासाठी शेड बांधले. हळूहळू त्यांनी एक एकर जागेवर १० हजार फुटांचे पोल्ट्री शेड बांधले. या शेडमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. हिवाळ्यात कोंबड्यांना उबदार ठेवण्यासाठी आवश्यक असलेले सर्व काही त्यात आहे, ज्यामध्ये एक हीटर, विविध दिवे, स्वयंचलित अन्न आणि पाण्याचे डिस्पेंसर, थंड करण्यासाठी इन्व्हर्टर आणि उन्हाळ्यासाठी वीज समाविष्ट आहे. या पोल्ट्री फार्ममध्ये एकावेळी १५,००० कोंबड्यांचे संगोपन करण्याची व्यवस्था आहे. वर्षभरात असे सहा भूखंड तयार केले जातात.

या कोंबड्या विक्रीसाठी तयार होण्यासाठी सुमारे ४५ दिवस लागतात. यानंतर कोंबडीची पूर्ण वाढ झाल्यावर कोंबडीची विक्री केली जाते. आशिषने पोल्ट्री फार्ममधून वर्षभरात ३० लाख रुपये कमावतो. तरुणांना स्पर्धा परीक्षांमध्ये अपेक्षित यश मिळत नसेल, तर त्यांनी शेतीशी संबंधीत जोडधंदा केला पाहिजे, असे त्याचे म्हणणे आहे. तरुणांनी पूरक व्यवसायांकडे वळले पाहिजे. तरुणांनी नोकरीच्या मागे न धावता स्वत:चा व्यवसाय उभा करून रोजगार निर्माण करावं असे तो म्हणाला.






### जागतिक दिवस:
### राष्ट्रीय मतदार दिवस
### राष्ट्रीय पर्यटन दिवस

#### महत्वाच्या घटना

१७५५ : मॉस्को विद्यापीठाची स्थापना झाली.
१९८० : संत मदर तेरेसा यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित.
१८८१ : थॉमस अल्वा एडिसन आणि अलेक्झांडर ग्रॅहॅम बेल यांनी ओरिएंटल टेलिफोन कंपनीची स्थापना केली.
१९८३ : आचार्य विनोबा भावे यांना मरणोपरांत भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
१९१९ : पहिले महायुद्ध संपल्यानंतर लीग ऑफ नेशन्सची स्थापना झाली.
१९४१ : 'प्रभात'चा 'शेजारी' हा चित्रपट रिलीज झाला.
१९५० : राष्ट्रीय मतदार दिन
१९७१ : हिमाचल प्रदेशला पूर्ण राज्याचा दर्जा मिळाला व ते भारताचे १८ वे राज्य बनले.
१९८२ : आचार्य विनोबा भावे यांना 'भारतरत्न'
१९९१ : मोरारजी देसाई यांना 'भारतरत्न'
१९९५ : अमेरिकेने ध्रुवीय प्रकाशाची माहिती घेण्यासाठी एक क्षेपणास्त्र सोडले. रशियन सरकारच्या रडारवर ते दिसू लागताच अमेरिकेने अण्वस्त्र सोडले असावे, असा संशय रशियन अधिकार्यांनी व्यक्त केल्यामुळे रशियाचे अध्यक्ष बोरिस येल्त्सिन यांनी अमेरिकेवर अण्वस्त्रे डागण्यासाठी 'न्युक्लिअर ब्रिफकेस' हातात घेतेली होती!
२००१ : स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर व शहनाईनवाझ बिस्मिल्ला खाँ यांना 'भारतरत्न'
२००२ : वायू सेनेचे पहिले ''एयर मार्शल'' म्हणून अर्जन सिंग यांची नियुक्ती.
२००४ : ऑपर्च्युनिटी नावाचे अंतरिक्ष यान मंगळावर यशस्वीरित्या उतरले.

#### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६२७ : रॉबर्ट बॉईल – आयरिश रसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: ३० डिसेंबर १६९१)
१७३६ : जोसेफ लाग्रांगे – इटालियन गणितज्ञ (मृत्यू: १० एप्रिल १८१३)
१८२४ : बंगाल चे प्रसिद्ध कवी माइकल मधुसूदन दत्त यांचा जन्म.
१८६२ : रमाबाई रानडे – 'सेवा सदन'च्या संस्थापिका व सामाजिक कार्यकर्त्या (मृत्यू: १९२४)
१८७४ : डब्ल्यू. सॉमरसेट मॉम इंग्लिश लेखक व नाटककार (मृत्यू: १६ डिसेंबर १९६५)
१८८२ : व्हर्जिनिया वूल्फ – ब्रिटिश लेखिका (मृत्यू: २८ मार्च १९४१)
१९३७ : भारतीय अभिनेत्री पद्मारणी यांचा जन्म.
१९३८ : सुरेश खरे – नाटककार व समीक्षक
१९५८ : कविता कृष्णमूर्ती – पार्श्वगायिका
१९६९ : प्रसिद्ध लेखक अश्विन संगी यांचा जन्म.
१९९० : प्रसिद्ध अभिनेत्री पूजा सावंत यांचा जन्म.

#### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६६५ : सोनोपंत डबीर
१९१८ : भारतातील स्कॉटिश सिव्हिलर्स विलियम वेडरबर्न यांचे निधन.
१९५३ : भारतीय उद्योजक नलिनी रंजन सरकार यांचे निधन.
१९८० : लक्ष्मणशास्त्री दाते – सोलापूरचे 'दाते पंचांग'कर्ते (जन्म: १८९०)
१९९६ : प्रशांत सुभेदार – रंगभूमी व चित्रपटांतील गुणी अभिनेते.
२००१ : विजयाराजे शिंदे – भारतीय जनता पक्षाच्या नेत्या (जन्म: १९१९)
२०१५ : मधुकर दत्तात्रय तथा म. द. हातकणंगलेकर – ज्येष्ठ समीक्षक आणि सांगली (२००८) येथील ८१ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष (जन्म: १ फेब्रुवारी १९२७ हातकणंगले).

## कडुनिंबावर पडणारा घातक 'डायबॅक' रोग

तेलंगणा आणि दक्षिणेकडील इतर राज्यांमध्ये गेल्या काही वर्षांपासून कडुनिंबाच्या डहाळ्या, पाने सुकणे, आणि झाड वाळणे असे दृश्य दिसत आहे. १९९० च्या दशकात उत्तराखंडमधील डेहराडून जवळील प्रदेशात या रोगाची नोंद झाली होती. त्यानंतर २०१९ मध्ये तेलंगणामध्ये 'डायबॅक' रोगाची प्रथम ओळख झाली. २०२१ साली तेलंगाना सोबतच कर्नाटक, आंध्रप्रदेश, या राज्यात या रोगाचा प्रसार वाढल्याचे निदर्शनास आले आहे.

'डायबॅक' रोगाची कारणे

कडुनिंबाच्या झाडावर येणाऱ्या या रोगाला शास्त्रीय भाषेत 'डायबॅक' असे म्हणतात. 'ट्वीग ब्लाईट' नावाने सुद्धा या रोगाला ओळखतात. फोमोप्सिस अ‍ॅझाडिराक्टे' बुरशीमुळे डायबॅक रोगाचा संसर्ग होतो. या बुरशीचा संसर्ग सर्व वयाच्या आणि आकाराच्या कडुनिंबाच्या झाडांना होतो. तज्ज्ञांच्या मते, खोडकिडीद्वारे कडुनिंबाच्या फांद्यांना छिद्रे पाडल्यानंतर या बुरशीजन्य रोगाचा प्रसार वाढतो. उच्च आर्द्रता आणि हवामानातील बदल हे देखील डायबॅक रोगाच्या बुरशीच्या प्रसारास जबाबदार आहे.

'डायबॅक' रोगाची लक्षणे

पावसाळ्याच्या सुरुवातीला या रोगाची लक्षणे दिसायला सुरुवात होते, आणि हिवाळ्याच्या सुरुवातीस रोगाची तीव्रता वाढत जाते. मर रोगामुळे कडुनिंबाच्या झाडांची पाने, डहाळे आणि फुलोरा प्रभावित होतात. पाने कोमेजतात, पिवळी आणि नंतर तपकिरी होतात, पानगळ होते, खोड आणि फांद्या गडद आणि पोकळ होतात, शेवटी संपूर्ण झाड वाळते/ मरते. उत्पादनावर दुष्परिणाम होतो. विशेषतः जुनी झाडे लवकर प्रभावित होतात व वाळतात. नवीन किंवा जास्त जुनी नसलेल्या कडुलिंबाच्या झाडांवर या रोगाचा संसर्ग कमी प्रमाणात होतो, किंवा रोगाची लागण झाली तरी अशी झाडे टिकतात.

'डायबॅक' रोगासाठी एकात्मिक नियंत्रण उपाय

या रोगावरील नियंत्रण पद्धती सोपी वाटत असली तरी आव्हानात्मक आहे. रोगास कारणीभूत असणाऱ्या बुरशीचे संक्रमण हवेतून होत असल्याने एका झाडावर नियंत्रण उपाय केल्यानंतरही शेजारच्या झाडाच्या बुरशीचे बीजाणू उपचार केलेल्या रोपाला/ झाडाला हानी पोहचवू शकतात. बरेचदा मोठ्या झाडांवर बुरशीनाशक/ कीटकनाशकाची फवारणी करणे धोकादायक ठरू शकते, कारण प्रादुर्भावीत झाडाजवळ असणारी फुलपाखरे, मित्रकिडी यासाठी ही फवारणी हानिकारक ठरते. तसेच या फवारणीमुळे पाण्याचे स्त्रोत सुद्धा दूषित होऊ शकतात. त्यामुळे प्रतिबंधात्मक आणि नियंत्रण उपायांचा योग्य प्रकारे आणि सावधगिरीने अवलंब करणे गरजेचे आहे. हा बीजजन्य आणि बीज प्रसारित रोग असल्यामुळे कडुनिंबाच्या बियांवर लागवडीपूर्वी बाविस्टीनची किंवा कार्बेन्डाझिमची बीजप्रक्रिया करावी. ट्रायकोडर्माचा वापर रोपांचे आरोग्य सुधारून त्यांची रोगप्रतिकारक क्षमता वाढविते. नियमित लक्ष ठेवता येईल अशा ठिकाणी कडुनिंबाची रोपे लावावीत, झाडांची आणि रोपांची नियमित पाहणी करावी. रोगग्रस्त झाडांच्या आणि रोपांच्या फांद्या छाटून नष्ट करावे आणि झाडाला/रोपाला बुरशीनाशक आणि कीटकनाशकांचे मिश्रण लावावे. रोगग्रस्त झाडाभोवती खड्डा खणून त्यात कीटकनाशक + बुरशीनाशक + पाण्याचे मिश्रण तयार करून ओतावे.

रासायनिक नियंत्रण उपाय : प्रोफेनोफॉस २ मिली प्रति लिटर या प्रमाणात संपूर्ण झाडावर, पानांवर फवारणी करावी. यानंतर मॅन्कोझेब ६३% + कार्बेन्डाझिम १२५ डब्ल्यूपीचे मिश्रण दुसऱ्या दिवशी फवारावे. काही संशोधनानुसार, सिस्टेनिक बुरशीनाशक कार्बेन्डाझिम ५०% हे हानिकारक रोग जनकांच्या विरूद्ध अत्यंत प्रभावी सिद्ध झाले आहे. कार्बेन्डाझिम ५०% ची पानांवर फवारणी करावी. प्रादुर्भाव झालेल्या झाडांवर १ ग्रॅम बाविस्टिन/ लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी.



# उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या आभार दौऱ्यास जालन्यापासून सुरुवात

## आ. अर्जुनराव खोतकर यांची पत्रकार परिषदेत माहिती



जालना । प्रतिनिधी

२५ जानेवारी रोजी जालन्यातआझाद मैदानावर आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या वतीने शिवसेनेचे सर्व कार्यकर्ते पदाधिकारी यांनी यावे व तसेच या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती भाग्यनगर येथे नेवासस्थानी पत्रकार परिषद मध्ये आमदार अर्जुनरावजी खोतकर यांनी माहिती दिली. यावेळी बोलताना ते म्हणाले की लाडक्या बहिणीचा मेळावा होणार आहे महाराष्ट्र राज्याचे विजय चे शिल्पकार फक्त एकनाथ शिंदे यांचा आहे असे ते म्हणाले तसेच २३७ जागा वरील विजय मुख्यमंत्री फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रयत्नामुळे झाला आहे. यावेळी लाडक्या बहिणींना ५००० फेटे बांधून स्वागत करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांचा आभार दौरा जालना जिल्ह्यापासून सुरुवात होणार आहे असेही माहिती आमदार श्री खोतकर यांनी दिली आहे विकासाला चलन देणारा हा दौरा असणार आहे. तसेच जालना शहरांमध्ये  कार्ड पीआर कार्ड संदर्भात जिल्हा भूमी अभिलेख कार्यालय मध्ये झालेला आहे याबाबत चौकशी होणार असल्याचे यावेळी आमदार अर्जुन खोतकर यांनी सांगितले.येत्या मार्च २०२५ च्या बजेटमध्ये लाडक्या बहिणींना एकवीसशे रुपये देण्याचा निर्णय होणार असल्याचा विश्वास आमदार अर्जुनराव खोतकर यांनी येथे व्यक्त केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे २५ जानेवारी २०२५ रोजी जालना दौर्यावर येत असून आझाद मैदानावर लाडकी बहिण व शिवसेनेच्या विशाल मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती आ. खोतकर यांनी  आयोजित पत्रकार परिषदेत दिली. जिल्ह्यातील लाडक्या बहिणी, शिवसेना पदाधिकारी-कार्यकर्त्यांसह नागरिकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहनही यावेळी आ. खोतकर यांनी केले.

यावेळी शिवसेनेचे संपर्क प्रमुख पंडीत भुतेकर, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शहरप्रमुख विष्णु पाचफुले,  आदींची उपस्थिती होती. लाडक्या बहिणींना मार्चच्या बजेटमध्ये एकवीसशे रु.चा निर्णय होणार!; आ. अर्जुनराव खोतकर यांना विश्वास; उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याविषयीची ओढ आणि प्रेम २५ जानेवारीला जाणवेल, आझाद मैदानावर विशाल मेळाव्याचे आयोजन  २५ जानेवारीला  आझाद मैदानावर आयोजन करण्यात आले आहे येत्या मार्च २०२५ च्या बजेटमध्ये लाडक्या बहिणींना एकवीसशे रुपये देण्याचा निर्णय होणार असल्याचा विश्वास आमदार अर्जुनराव खोतकर यांनी येथे व्यक्त केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे २५ जानेवारी २०२५ रोजी जालना दौर्यावर येत असून आझाद मैदानावर लाडकी बहिण व शिवसेनेच्या विशाल मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती आ. खोतकर यांनी गुरुवार (दि २३) आयोजित पत्रकार परिषदेत दिली. जिल्ह्यातील लाडक्या बहिणी, शिवसेना पदाधिकारी-कार्यकर्त्यांसह नागरिकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहनही यावेळी आ. खोतकर यांनी केले. यावेळी शिवसेनेचे संपर्क प्रमुख पंडीत भुतेकर, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शहरप्रमुख विष्णु पाचफुले, ॲड. भास्कर मगरे आदींची उपस्थिती होती.  आ. खोतकर यांनी सांगितले की, राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच माजी मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे हे यांनी त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात धडाडीचे निर्णय घेतले, गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित विषय शिंदे यांनी मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात मार्गी लावले. त्यामुळेच महायुतीचा मोठा विजय झाला आहे. महायुतीच्या विजयाचे एकनाथराव शिंदे हेच शिल्पकार आहेत. २६७ जागांचे बहुमत हा एक इतिहास झाला आहे. भुतकाळात कधीही ऐवढे मोठे बहुमत कुणाला मिळालेले नाही.यासाठी शिवसेना जिल्हा, तालुका, शहर, प्रभाग, वार्ड, अंगीकृत संघटना कामाला लागल्या आहेत. मोठा न भुतो न भविष्यती असा मेळावा होणार असल्याचे सांगतांना आ. खोतकर यांनी बोलण्याचे धाडस करतो म्हणत मा. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जशा सभा होत होत्या त्या प्रमाणे एकनाथ शिंदे यांची सभा होईल असा विश्वास व्यक्त केला. सुमारे पाच हजार महिला फेटे घालून शिंदे यांचे स्वागत करणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे राज्यभर दौरे करणार आहेत. या दौर्यांची सुरुवात जालन्यातून होत आहे. विधानसभा विजयानंतर त्यांचा हा पहिला आभार दौरा आहे. ते लाडक्या बहिणींचे आभार मानण्यासाठी जालन्यात येत आहेत. तसेच नवीन सरकार नवीन जबाबदारी तसेच पक्ष बळकटीकरणासाठी हा दौरा महत्त्वाचा ठरणार आहे. शहरातील विविध प्रश्न त्यांच्या पुढे आपण मांडणार असून जालन्याच्या विकासाला चालना देणारा हा दौरा ठरणार असल्याचेही आ. खोतकर म्हणाले.

## || थोडक्यात



### रविशंकर विद्या मंदिर येथे आनंदनगरी व हळदी कुंकू कार्यक्रम साजरा

बीड । प्रतिनिधी

श्री श्री रवी शंकर विद्यामंदिर येथे मंगळवार रोजी  शाळेमध्ये हळदी कुंकू आणि आनंदनगरी या दोन्ही कार्यक्रमाचे आयोजन केलेले होते या कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्या,उप मुख्याध्यापिका आणि सर्व महिला च्या हस्ते रिबीन कट करून झाली. या कार्यक्रमांमध्ये प्रमुख आकर्षण आपल्या पारंपारिक लोककलेचा देखावा होता यामध्ये तुळशीची पुजा करणारी महिला,वासुदेव, पोतराज ,पंढरीच्या वारीचे वारकरी, गोंधळी, लावणी ,विठ्ठल रुक्मिणी सर्व संत मंडळी इत्यादींचा समावेश होता. या देखाव्यामुळे सर्वांना आपली लोककला काय आहे हे समजले. तसेच सर्व विद्यार्थ्यांनी खाण्याच्या पदार्थांचे स्टॉल लावले होते यामध्ये पाणीपुरी, शेंगदाणे फुटाणे ,लेमन गोळ्या ,गाजराचा हलवा , केक, , पावभाजी, वडापाव ,वेफर्स ,उडीद वडे इडली सांबर, जिलेबी भजी ,वेगवेगळ्या प्रकारचे ड्रिंक्स, कोल्ड कॉफी इत्यादी प्रकारचे पदार्थ विद्यार्थ्यांनी ठेवले होते. हा सर्व कार्यक्रम पाहण्यासाठी पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. यामध्ये सर्व खाद्यपदार्थाचा आस्वाद सर्व विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी घेतला. या कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन अमृता देशपांडे  आणि अपूर्वा जोशी  या दोघींनी केले. या कार्यक्रमासाठी शाळेचे अध्यक्ष श्री पारगावकर सर , श्रीमती स्नेहा पारगावकर  , सचिव पाशा सर, मुख्याध्यापक हंसे सर, उपमुख्याध्यापिका श्रीमती अनिता सूर्यवंशी, सर्व शिक्षक वृंद आणि मोठ्या संख्येने पालक वर्ग उपस्थित होता. अशा रीतीने हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्वांचे विशेष सहकार्य लाभले.

### आठव्या आर्थिक गणनेसाठी राज्यात हालचाली सुरु

बीड : केंद्र शासनातर्फे राष्ट्रव्यापी आठवी आर्थिक गणना सन २०२५-२०२६ घेण्यात येणार असून सदर गएनेमध्ये आर्थिक कार्यात गुतंलेल्या सर्व उद्योग, व्यवसाय आणि सेवा यांची गणना प्रत्यक्ष घरोघरी, कुटुंबास, उद्योगास भेटी देऊन करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हास्तरीय समन्वय समितीचे अध्यक्ष अविनाश पाठक यांनी कळविले आहे.राज्याच्या भोगोलिक सीमांतर्गत कुटुंबाच्या सीमांतर्गत निवासी जागेत, कुटुंबाच्या निवासाबाहेर संरचना असलेल्या, घरगुती उपक्रम, सार्वजनिक व खाजगी घेणे हा आर्थिक गणनेचा प्रमुख उद्देश आहे.आर्थिक गणनेव्दारे उपलब्ध होणारी माहिती राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय उत्पन्न व राज्य स्मरावरुन राज्य उत्पन्न यासंदर्भातील अंदाज तसेच राष्ट्रीय व्यावसाय नोंदणी अचूकपणे तयार करण्यासाठी उपयुक्त होणार आहे. सदर माहिती जिल्हा व राज्यस्तरावर सामाजिक व आर्थिक व्यवस्थापन तसेच नियोजन यासाठी उपयोगी येणार आहे सदर गणनेच्या कालबध्द अंमलबजावणीसाठी क्षेत्राकामाचे प्रभावी सनियंत्रण व समन्वयासाठी विविध स्तरावर समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत.

# तुका विप्र हे अठराव्या शतकातील महान संत होते-त्र्यंबक महाराज मातकर

## अंजनवती येथे अखंड हरिनाम साप्ताहास प्रारंभ



बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील अंजनवती येथे तुका विप्र या महान साधुंची चैतन्यदायी समाधी आहे. तुका विप्र हे अठराव्या शतकातील महान संत होते असे प्रतिपादन ह.भ.प.त्र्यंबक महाराज मातकर यांनी केले. ते अंजनवती येथे सुरु झालेल्या संत तुका विप्र महाराजांच्या २३३ व्या पुण्यतिथीनिमित्त कीर्तनात बोलत होते. दि.२३ जानेवारी रोजी श्री क्षेत्र तुका विप्र संस्थान, अंजनवती येथे अखंड हरिनाम सप्ताह सुरू झाला. माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते अभिषेक पूजा, मृदंग, वीणा, टाळ पूजन करून सप्ताहाचा आरंभ झाला.

सप्ताह आरंभाची कीर्तनसेवा त्र्यंबक महाराज मातकर यांनी केली. त्यांनी प्रथमच संत तुका विप्र महाराजांच्या ,' सांगितली ऐसी वाट  नाम कथा वैकुंठ ' या अभंगावर सखोल अभ्यासपूर्ण चिंतन केले. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम यांच्या कालसुसंगत वारकरी संप्रदायाचा प्रसार व प्रचार संत तुका विप्र यांनी केला असेही ते म्हणाले. त्यावेळी दूध संघाचे अध्यक्ष विलास बडगे, सरपंच कैलास येडे, तुका विप्र संस्थानचे अध्यक्ष रवींद्र विप्र, माणिक महाराज विप्र, शिवणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय शिकवणीचे प्राचार्य विलासराव येडे, कैलास महाराज काटवटे, कृष्णा जोशी, धनंजय कुलकर्णी, सतिश महाराज लांडगे, गोवर्धन जाधव, सुनील मोरे, प्रा.पंजाब येडे, अशोक येडे, पांडुरंग मोरे, श्रीरंग बापू येडे, तुकाराम सगळे उपस्थित होते. कीर्तन संगीत साथीसाठी संस्थानचे दिंडी चालक अर्जुन महाराज पाटील, गोवर्धन महाराज कोरडे, बंडू महाराज जटाळ, मृदंग वादक संदीप महाराज आमटे, गायक शिवमूर्ती येडे, हौसराव महाराज ढास, विष्णू येडे,आश्रुबा येडे, गजेंद्र महाराज येडे, पवार महाराज, विठ्ठल महाराज येडे , रामदास महाराज येडे, परमेश्वर महाराज येडे, आनंद महाराज येडे, आश्रुबा काटवटे, रामहरी बहीर यांच्यासह अनेक भाविक उपस्थित होते.

# बालगृहात दाखल झालेल्या मुलींना ३० दिवसात घेऊन जाण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

पुढीलप्रमाणे मुली बालगृहात दाखल झालेल्या असून वृत्त प्रसिध्द झाल्यपासून ३० दिवसात मुलींना घेऊन गेले नाही तर तर कोणताही हक्क अथवा दावा बालकल्याण समिती बीड ग्राह्य धरणार नाही असे आवाहन बाल कल्याण समिती बीड यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.कु.आरती,वय.०९ वर्षे ०२ महिने ही रंगाने सावळी असून चेहरा गोलाकार आहे, व उंची १२४. आहे.ती शरीराने सडपातळ आहे.तिला मा. बालकल्याण समिती बीड,यांच्या आदेशान्वये दिनांक ०६/०४/२०२१ रोजी शंतिवन मुलींचे बालगृह, आर्वी, ता. शिरूर कासार जि. बीड येथे दाखल करण्यात आले आहे.बालिकेस दाखल केल्यापासून कोणीही आई वडील व इतर नातेवाईक भेटण्यास आले नाही.

कु.सिद्दी संगीता ओहळ वय.१५ वर्षे ०१ महिने ही रंगाने सावळी असून चेहरा लंबगोलाकार आहे, व उंची १४५. आहे.ती शरीराने सडपातळ आहे.तिला मा.बालकल्याण समिती बीड,यांच्या आदेशान्वये दिनांक २८/१०/२०२१ रोजी शंतिवन मुलींचे बालगृह, आर्वी, ता.शिरूर कासार जि. बीड येथे दाखल करण्यात आले आहे.बालिकेस दाखल झाल्यापासून कोणीही आई वडील व इतर नातेवाईक भेटण्यास आले नाही. बालिकांवरात हक्क दाखवणारे माता पिता, पालक व इतर नातेवाईक यांनी खालील पत्ता व दिलेल्या संपर्क क्रमांकावर बातमी प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत संपर्क साधावा हि विनंती. अन्यथा मा.बालकल्याण समिती बालिकांबाबत योग्य ते कायदेशीर निर्णय घेईल.संपर्क साधावा बालकाचा फोटो व बातमी प्रसारीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत मा. जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, बीड, बालकल्याण समिती,शांतीवन मुलींचे बालगृह, आर्वी, जि. बीड. तसेच संस्थेच्या पत्यावर अथवा अधीक्षक- मो. क्र.९९२३७७२६९४, ९४२१२८२३५९ फोनवर संपर्क करावा अन्यथा बालकल्याण समिती बालकाबाबत योग्य ते कायदेशीर निर्णय घेईल.

# वाळू उपसा करणाऱ्या व्यक्तीकडून तहसीलदारांसह पथकाला जिवे मारण्याची धमकी

अंबड । प्रतिनिधी

वाळू उपसा करणाऱ्या विरुद्ध कारवाईसाठी अंबड तहसीलदार व त्यांचे पथक केले असता कारवाईदरम्यान एका व्यक्तीने त्यांना जीव मारण्याची धमकी दिली याप्रकरणी अंबड तहसीलदार विजय लक्ष्मण चव्हाण यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली या प्रकरणी करीत घटना  २३/०१/२०२५ रोजी घडली  कृष्णा एडके, मंडळ अधिकारी गोंदी, तलाठी साडेगाव  विनोद ठाकरे, तलाठी पाथरवाला बु. स्वप्निल खरात, तलाठी घुंगर्डे हातगाव दिपक लव्हाळे, तलाठी हसनापुर आनंद जांभळे, तलाठी गोंदी किरण जाधव असे अवैध गौण खनिज विरोधी कारवाया चोरी व उत्तखन रोखण्यासाठी पथकासह सकाळी ११.०० वाजता तहसिल कार्यालय अंबड येथुन रवाना झाले.

अंबड तहसिल कार्यालय हद्दीत गस्त घालत असताना पाथरवाला गावातील गोदावरी नदीपात्रातील बाबाची थडी या ठिकाणी गस्त कामी हजर असताना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, मौजे पाथरवाला बुद्रुक गट क्रमाक ७४ येथे एक केनिसह ट्रक्टर उभे असल्याचे सांगितले. बातमीची खात्री करणेसाठी आम्ही वर नमुद पथकासह १३.३० वाजेच्या सुमारास त्या ठिकाणी गेलो असता सदर ठिकाणी लाल रंगाचे महिंद्रा कंपनिचे ५७५ या मॉडेलचा ट्रक्टर हेड हे मागिल बाजुला वाळु उत्खनन करण्यासाठी वापरण्यात येणा-या केनिसह आढळुन आले. सदर वाहनावर कसल्याही प्रकारचा आरटिओ क्रमांक दिसुन आला नाही. सदर ठिकाणी बाजुच्या शेतात एक व्यक्ती उपस्थित होते त्यांना बोलावुन सदर वाहनाबाबत कोणाचे मालकिचे आहे याबाबत विचारणा केली असता सदर ट्रक्टर वाहन हे राहुल विक्रम फुलारे रा. पाथरवाला यांचे मालकिचे असलेबाबत सांगितले. त्यानंतर सदरचे वाहन हे महाराष्ट्र महसुल संहिता १९६६ चे कलम ४८(७) (८) व प्रचलित इतर कायद्यानुसार कार्यवाही करण्याकरिता ताब्यात घेवुन जप्त करुन घेवु जात असताना व सदरील वाहन हे तहसिल कार्यालय अंबड येथे पुढील कारवाई करिता घेवुन जात असताना एक व्यक्ती मोटारसायकलवर येवुन सदर मोटारसायकल ही सदर ट्रक्टर वाहनास आडवी लावले त्यावर त्यांना तुम्ही शासकिय कामात अडथळा का करित आहात असे विचारले असता त्याने तुम्ही हे वाहन घेवुन जावुच शकत नाही मी बघतोच तुम्ही कसे घेवुन जाता असे बालुन सदर ट्रक्टर चालवत असलेले तलाठी स्वप्निल खरात यांना खाली ओढले व पथकासोबत हुज्जत घालुन जिये ठार मारण्याची धमकी दिली व स्वःत ट्रक्टर बाहनावर बसुन सदरचे वाहन हे पथकाचे ताब्यातुन चोरी करून घेवुन पळवुन घवुन गेले व आम्ही करित असलेल्या शासकिय कर्तव्यात फौजदारीपात्र बलप्रयोग करून शासकिय कामात अडथळा आणला, शासकिय लोकसेवक त्याचे कर्तव्य करित असताना त्याने धाकाने परावृत्त व्हावे यासाठी आमच्या पथकाविरुध्द महिलांकरवि आमचेवर खोटे गुन्हे दाखल करु, तुम्हाला जिवंत सोडणार नाही, तुम्हाला संपून  टाक अशा प्रकारच्या धमक्या दिल्या. म्हणून माझी त्याचे विरुध्द सरकार तर्फे भारतिय न्याय संहिता २०२३ चे कलम १३२,३०३(२) तसेच महाराष्ट्र जर्मिन महसूल संहिता कलम ४८(७) (८) व महाराष्ट्र राजपत्र १२ जानेवारी २०१८ चे तरतुदीनुसार माझी राहुल विक्रम फुलारे रा. पाथरवाला  याचेविरुध्द कायदेशिर तक्रार आहे.

# क्रीडा सप्ताहा निमित्ताने विविध क्षेत्रातील नागरिक,विद्यार्थ्यांचा गौरव

## शहरी व ग्रामीण भागात क्रीडा संस्कृती रुजवण्यास मदत होते : डॉ. सुधाकर चिंचाणे

बीड । प्रतिनिधी

क्रीडा दिन व सप्ताह आयोजनाने शहरी भागासह ग्रामीण भागात क्रीडा संस्कृती रुजण्यास मदत होते असे प्रतिपादन जिल्हा नियोजन अधिकारी डॉ. सुधाकर चिंचाने यांनी केले.राज्य शासनाद्वारे १५ जानेवारी हा दिवस ऑलिंपीकवीर दिवंगत खाशाबा जाधव यांचा जन्मदिन राज्य क्रीडा दिन म्हणुन साजरा करण्यात येत आहे.

दिवंगत खाशाबा जाधव, गोळेश्वर, कराड जिल्हा सातारा यांनी ऑलिम्पीक क्रीडा स्पर्धा, हेलसिंकी १९५२ मध्ये पहिले वैयक्तिक क्रीडा प्रकारातील कुस्ती क्रीडा प्रकारात पहिले पदक (कास्य) पटकावून देशाच्या क्रीडा क्षेत्रात ऐतिहासिक कामगिरी केलेली आहे. त्यांची आंतरराष्ट्रीय स्तरावरील कामगिरी राज्याचा बहुमान व नवोदित खेळाडूंना दर्जेदार कामगिरी करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे यासाठी दिवंगत खाशाबा जाधव यांचा जन्मदिन दि. १५ जानेवारी हा क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. महाराष्ट्रातील क्रीडा संस्कृती जोपासना व जनतेमध्ये क्रीडा वातावरण निर्माण होण्याच्या दृष्टीने राज्यातील प्रत्येक जिल्हयात दर वर्षी क्रीडा सप्ताह साजरा करण्यात येतो.जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद बीड यांच्या संयुक्त विद्यामाने बीड जिल्हयात विविध ठिकाणी दि. १५ जानेवारी २०२५ ऑलंपीक वीर दिवंगत खाशाबा जाधव यांचा जन्मदिन  राज्य क्रीडा दिन व दि. १५ जानेवारी ते २१ जानेवारी हा  क्रीडा सप्ताह  निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर प्रसंगी उपस्थित खेळाडूंना मार्गदर्शन करतांना खेळाडू विद्यार्थ्यांनी सदर उपक्रमात सहभागी होणे आवश्यक आहे.  राज्य क्रीडा दिनाचे  व क्रीडा सप्ताहच्या आयोजनामुळे शहरी व ग्रामीण भागात क्रीडा संस्कृती रुजवण्यास मदत होती. प्रतिपादन जिल्हा नियोजन अधिकारी डॉ. सुधाकर चिंचाणे यांनी केले.राज्य क्रीडा दिनाचे  औचित्य साधुन व क्रीडा  क्रीडा सप्ताहाच्या  क्रीडा सप्ताहाच्या समारोप प्रसंगी बीड जिल्हयातील सन २०२४-२५ या वर्षात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर सहभागी झालेल्या व सप्ताहा अंतर्गत विविध स्पर्धा व उपक्रमात सहभाग घेवून प्राविण्य मिळविलेले खेळाडूंचा दिनांक २१ जानेवारी २०२५ रोजी क्रीडा संकुल हॉल, बीड येथे जिल्हा नियोजन अधिकारी  यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व चषक ( ट्रॉफी ) देवून गौरव करण्यात आला. सदर प्रसंगी दिव्य दै. दिव्य मराठी जिल्हा प्रतिनिधी  दिनेश लिंबेकर, शिव छत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारार्थी जेष्ठ क्रीडा संघट प्रा. जे.पी. शेळके, जिल्हा क्रीडा अधिकरी अरंविद विद्यागर, सेवा निवृत्ती क्रीडा अधिकारी पंडित चव्हाण, प्रा. भागचंद्र सानप, डॉ. अविनाश बारगजे,  प्रा. गोपाल धांडे, प्रा. दिनकर थोरात, डॉ. कविता कराड, विनायक वझे, तत्वशिल कांबळे, क्षितीजा गव्हाणे रामदास गिरी, अफरोज शेख,सुनील वाघमारे, आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्तावित जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी केले तर आभार क्रीडा अधिकारी अनिकेत काळे यांनी मांडले राज्य क्रीडा दिन  निमित्ताने बीड जिल्हयातील सन २०२४-२५ वर्षामध्ये पुढील राष्ट्रीय खेळाडूंचा नयन बारगजे, चौरे रत्नमाला,  चौरे पंकजा, काळे राम, मुंडे ओंकार, आंधळे तनुजा,  तिडके पुजा,  यश जाधव, सुरज येवले, ओंकार मोरे, आकाश खांडे, आर्यन येळवे, आदित्य तांदळे, वेदांत डावकर,  वृषभ शिंदे,  सार्थक पवार, नंदिनी मुळुक,  समुध्दी काळकुटे, साक्षी ताटकर, अक्षरा चोले, शिवम कापसे, शिवराज कांतुले, स्नेहल शिंदे, अक्षरा पवार, मोहम्मद आदेक, ओमकार परदेशी, सार्थक भाकरे, कार्तिकी मिसाळ, यशस्वी चव्हाण, धवन तांबारे, मोहमद अली, आदिती लोंढे यांच्यासह क्रीडा सप्ताह निमित्ताने आयोजित विविध स्पर्धेत सहभाग घेवून प्राविण्य मिळविलेले खेळाडू, व संघ खो - खो महिला प्रथम विजेता संघ प्रयिंका इंगळे वारियस, द्वितीय रत्नभुमी रायसींग स्टार्ट तृतीय संघ स्पीड क्वीन सावरपाडा एक्सप्रेस, खो - खो पुरुष रत्नभुमी चॅम्पियन्स द्वितीय रत्नभुमी रायडर्स, तृतीय रॅपीट रॉकर्स, टेबल टेनिस स्पर्धेत प्रथम आरुष टाक, द्वितीय पार्थ कुंभार, तृतीय आदित्य चांडक चित्रकला स्पर्धा विजेता प्रथम नाईकवाडे दिपाली, द्वितीय आडे शिल्पा, तृतीय चौरे शिवकन्या. वकृत्व स्पर्धा विजेता प्रथम किर्ती इंदुरे, द्वितीय पुर्वा घोरपडे, तृतीय तेजस्वनी काटवटे. व बीड जिल्हयातील क्रीडा क्षेत्रात उल्लेखनिय कार्य केलेले तालुका क्रीडा संयोजक दत्ता देवकते,  माजेद शेख, गव्हाणे, दिपक धोंडे,  सचिन मोती, संजय देशमुख, उज्वल गायकवाड,विजय जाहेर, सय्यद सतार यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देवून गौरव

# अंबड पालिका कर्मचाऱ्यांकडून बेटी बचाओ बेटी पढाओ मोहीम



अंबड । प्रतिनिधी

अंबड नगर परिषद च्या कर्मचाऱ्याकडून कार्यालयामध्ये व शहरात दिनांक २२ जानेवारी २०२५ रोजी नगर परिषद अंबड च्या वतीने शहरातून बेटी बचाव बेटी पढाओ जनजागृती  मोहीम राबून मोटारसायकल रली काढण्यात आली, सामुहिक स्वाक्षरी मोहीम व बेटी बचाओ बेटी पढाओ ची प्रतिज्ञा घेण्यात आली.

महिला व बाल विकास मंत्रालया मार्फत बेटी बचाव बेटी पढाव कार्यक्रम राबविण्यात येत असुन, ''बेटी बचाव बेटी पढाव योजनेला दि. २२ जानेवारी २०२५ रोजी दहा वर्ष पुर्ण  झाले असून असल्याने  मा. जिल्हाधिकारी श्रीकृष्णनाथ पांचाळ यांचे दि. १७ जानेवारी २०२५ चे आदेशान्वये वरून दि. २२ जानेवारी २०२५ च्या अनुषंगाने अंबड पालिकेतील कर्मचारी व शहरातील मुली व महिला यांनी सहभाग नोंदविला होता बेटी बचाव बेटी पढाव हा कार्यक्रम अंतर्गत मोहीम राबविण्यात आली  आहे तसेच प्रतिज्ञा घेऊन व स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली व शहरात प्रभातफेरी/सायकल रॅली/ मोटारसायकल रॅली काढण्यात आली व सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बेटी बचाओ बेटी पढाओ, बाईक रॅली मध्ये अंबड नगरपरिषदेतील सहभागी कर्मचारी व अंबड शहरातील सहभागी नागरिक होते.

# मुख्यबाजार पेठेतील रस्त्याची चाळण; प्रशासन गाफील

## बाजारपेठ बेमुदत बंद ठेवण्याचा दिला इशारा

किल्ले धारूर । प्रतिनिधी

किल्ले धारूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते हुतात्मा काशिनाथराव चिंचाळकर चौक तसेच जुना सरकारी दवाखाना या मुख्य रस्त्याची दैनिक अवस्था झालेली आहे याच रस्त्यावर धारूरचि मुख्य बाजारपेठ आहे त्यामुळे या रस्त्यावर रहदारी पाहायला मिळते परंतु या मुख्य बाजारपेठेतला मुख्य रस्ता मागील अनेक वर्षापासून झालेलाच नसल्याने या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडलेले आहेत या खड्ड्यातून मोठ्या प्रमाणावर माती बाहेर निघत असून या मातीचे रूपांतर धुळीत होत असून याचा मोठ्या प्रमाणावर त्रास येथील दुकानदारांना होत आहे. असे असताना मात्र नगरपरिषद प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत असल्याने येथील तालुका व्यापारी महासंघाच्या वतीने नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना निवेदन देऊन रस्ता करण्याची मागणी केली आहे.

किल्ले धारूर शहरे ऐतिहासिक शहर आहे या शहरात खूप जुनी बाजारपेठ आहे या बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर ग्रामीण भागातील लोक व्यापारासाठी व खरेदी विक्रीसाठी येतात मात्र सध्या ही बाजारपेठ व्यवस्थित रस्ता नसल्याने चर्चेत आहे छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जुने ग्रामीण रुग्णालय धारूर तसेच शहरातील अनेक ठिकाणच्या रस्त्याची दैना झालेली आहे मुख्य बाजारपेठ असल्याने या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वाहनांची व नागरिकांची रहदारी पाहायला मिळते मात्र सध्या नागरिक वाहन चालक व व्यापारी येथील रस्ता अत्यंत झाला असल्याने यातून निघणाऱ्या धुळीपासून बेजार आहेत यामुळे व्यापाऱ्यांना धुईमुळे अस्थमा सारखे आजार होऊ लागले आहेत तसेच किराणामाल, मेडिकल, माळवे जे की आत्या आवश्यक सेवा आहेत मालावर धुळ जाऊन बसत आहे



यामुळे भाजीपाला किराणा वस्तू खराब होऊ लागल्या आहेत परिणामी व्यापाऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे या संदर्भात नगरपरिषद प्रशासनाला यादीही व्यापाऱ्यांच्या वतीने रस्त्या संदर्भात निवेदन देण्यात आले मात्र निवेदनाची कसलीही दखल नगर परिषद प्रशासनाने घेतलेली नाही त्यामुळे पुन्हा दि २४ जानेवारी रोजी येथील व्यापाऱ्यांनी नगरपरिषद प्रशासनाला निवेदन दिले असून या निवेदनात मुख्य बाजारपेठेतील रस्ता करण्याची मागणी करण्यात आली आहे. दि १४ फेब्रुवारी पर्यंत रस्ता करण्यात आला नाही तर बेमुदत बाजारपेठ बंद करण्यात येईल असाही इशारा दिलेल्या निवेदनात देण्यात आला आहे त्यामुळे आता तरी नगरपरिषद प्रशासन रस्ता करणार आहे का असा प्रश्न या अनुषंगाने उपस्थित होत आहे. दिलेल्या निवेदनावर व्यापारी संघटनेचे अध्यक्ष अशोक जाधव, माजी नगरसेवक मदनरावजी धोत्रे, डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष मयूरजी सावंत, मा नगरसेवक यशवंतराव गायके,व्यापारी संघटनेचे सचिव निलेश दुबे, कृष्णा भावठनकर,नितीन जाधव,अमर महामुनी, धीरज चिंचाळकर,सचिन संक्राते,शिवाजीराव ढगे, बाळू गुळवे, भरत शिंनगारे, रामजी तोष्णीवाल, महेश चिद्रावार, सिद्दिकभाई तांबोळी आदी व्यापाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.




राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित दादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली तसेच अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज महाराष्ट्र राज्याच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या सन २०२५ - २६ च्या अर्थसंकल्पीय मागण्यांच्या अनुषंगाने बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये अर्थसंकल्पीय मागण्यांच्या अनुषंगाने तसेच विभागातील विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तयार करण्यात येत असलेल्या रोडमॅपचे विभागाच्या वतीने सादरीकरण करण्यात आले. या बैठकीस अर्थ व नियोजन तसेच अन्न व नागरी पुरवठा विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# खडकत ग्रामपंचायतीने घेतला गोवंश हत्या बंदीबाबतचा ठराव; अवैध कत्तलखान्यांना अखेर घातला लगाम

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील खडकत गावात गेल्या अनेक वर्षांपासून गोवंशाची हत्या केली जात असून प्रशासनाने अनेक वेळा कारवाया करत अवैध कत्तलखाने सील करूनही बेकायदेशीर कत्तलीला लगाम लागत नसल्याने ग्रामपंचायतीने गोवंश हत्याबंदीबाबतचा ठराव गुरुवारी (ता. २३) रोजी घेतला आहे.

राज्यात २०१५ पासून गोवंश हत्याबंदी कायदा लागू करण्यात आला. मात्र प्रभावी अंमलबजावणीअभावी तालुक्यातील खडकत येथे अवैध कत्तलखान्यांद्वारे मोठ्या प्रमाणात गोवंशीय प्राण्यांची हत्या करून गोवंशीय प्राण्यांचे मांस देशातील विविध भागात पाठविण्यात येत आहे. त्यामुळे हा कायदा कागदावरच राहिल्याचे दिसून येत आहे.

मपोलिस अधीक्षकांनी अवैधरित्या सुरू असलेल्या अवैध कत्तलखान्यांवर अनेक वेळा कारवाया करून मोठ्या प्रमाणावर गोवंशीय प्राण्यांचे मांस जप्त करत गुन्हे दाखल केले. तसेच शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या कार्यकर्त्यांनी अनेक वेळे गोवंश हत्येविरुद्ध आवाज उठविला.

मानद पशु कल्याण अधिकारी शिवशंकर स्वामी यांनीही अवैध कत्तलखान्यांविरोधात पाठपुरावा केल्यानंतर प्रशासनामार्फत गावातील सात ते आठ अवैध कत्तलखाने जेसीबीच्या साह्याने उद्ध्वस्त करण्यात आले. मात्र, एवढ्या कारवाया होऊनही गावातील अवैध गोवंशीय यामुळे घेण्यात आला ठराव खडकत येथील बेकायदेशीररित्या सुरू असलेल्या गोवंशीय प्राण्यांच्या कत्तलीमुळे गावाचे पावित्र्य धोक्यात आले आहे. गावात रोगराई व दुर्गंधी पसरत असल्यामुळे ग्रामस्थांच्या आरोग्याला बाधा होत असल्याने ग्रामपंचायतीने हा ठराव घेतला असल्याचे सरपंच काटे यांनी सांगितले. प्राण्यांच्या कत्तलीला लगाम बसलेला नाही. या पार्श्वभूमीवर गुरुवारी सरपंच सविता शांतीलाल काटे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायतीत आयोजित ग्रामसभेत गोवंश हत्याबंदी करणेबाबतचा ठराव घेण्यात आला. दरम्यान, खडकत गावातून जात असलेल्या सीना नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर अवैध उपसा होत आहे. याबरोबरच गावात जुगार अड्डे, बनावट दारू, गुटखा विक्री व मटक्यासारखे अवैध धंदे सुरू असून यामुळे तरूण पिढी व्यसनाधीन होत असल्याने गावातील अवैध धंदे बंद करण्याबाबतचा ठरावही ग्रामपंचायतीने गुरुवारी झालेल्या ग्रामसभेत घेतला आहे. पोलीस प्रशासनानेही सहकार्य करावे, अशी मागणी करण्यात आली.

# दामिनीताई आम्हाला तुझा सार्थ अभिमान आहे

## धनंजय मुंडे यांनी केले कौतुक व अभिनंदन

मुंबई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून प्रजासत्ताक दिनाच्या राजधानी दिल्लीतील कर्तव्यपथावरील मुख्य ध्वजारोहण सोहळ्यात बीड जिल्ह्याची लेक, फ्लाईंग ऑफिसर दामिनी देशमुख ध्वजारोहणानंतर ध्वजावर हवाई पुष्पवृष्टी करणार आहे. याबद्दल मंत्री धनंजय मुंडे यांनी सोशल मीडियावर दामिनी देशमुख यांचे अभिनंदन व कौतुक केले आहे.



बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यामधील देवडी गावची दामिनी दिलीप देशमुख वायुदलात फ्लाईंग ऑफिसर म्हणून कार्यरत असून राजधानी दिल्लीतील कर्तव्यपथावर होणाऱ्या मुख्य सोहळ्यात 'परेड कमांडर' म्हणून जबाबदारी सांभाळणार आहे, हा सोहळा पाहताना बीड जिल्हा वासीय म्हणून आमच्या सर्वांच्या हृदयात आनंद आणि अभिमान दाटून येईल एवढं नक्की! असे धनंजय मुंडे यांनी आपल्या पोस्ट मध्ये म्हंटले आहे. तसेच दामिनी ताई आम्हाला तुझा सार्थ अभिमान आहे, तुझे खूप खूप अभिनंदन असेही आपल्या पोस्ट मध्ये म्हटले आहे.

# दिव्यांग मतदार बांधवांनी राष्ट्रीय मतदार दिन कार्यक्रमात सहभाग नोंदवावा -राजेंद्र लाड

आष्टी । प्रतिनिधी

मा. भारत निवडणूक आयोग व मा. मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांच्या वतिने दि. २५ जानेवारी २०२५ रोजी १५ वा राष्ट्रीय मतदार दिवस संपूर्ण भारत देशात , या थीम वर साजरा करण्यात येणार आहे. या अनुषंगाने बीड जिल्ह्यातील दिव्यांग मतदार बांधवांनी आपआपल्या तालुक्याच्या तहसिल कार्यालयात उपस्थित राहून राष्ट्रीय मतदार दिन साजरा करावा असे आवाहन दिव्यांग मतदार नोंदणी, जिल्हाधिकारी कार्यालय बीड चे दिव्यांग मतदार राजदूत राजेंद्र लाड यांनी केले आहे.



या दिवशी बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यात सर्व महाविद्यालये, पान ३ वर




बीड : शहरामध्ये स्वामी समर्थ पादुकांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. शुक्रवारी ही मिरवणूक सहयोग नगर गणेश मंदिरापासून निघाली ती सुभाष रोड मार्गे थोरले पाटांगण या ठिकाणी पोहोचली . हा कार्यक्रम ३१ जानेवारीपर्यंत चालणार असल्याची माहिती स्वामी समर्थांच्या भक्तांनी दिली. या मिरवणुकीत बीड विधानसभेचे आमदार संदीप क्षीरसागर यांनीही सहभाग नोंदवला

# बीडजवळ होणारा उड्डाणपूल ३ पदरीऐवजी ६ पदरी होणार

## डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या मागणीनंतर पालकमंत्री ना.अजितदादा पवार, धनंजय मुंडेंकडून मोठा बदल



बीड । प्रतिनिधी

सोलापूर-छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गावर बीड शहरालगत स्लीप रोडसह महालक्ष्मी चौकात उड्डाणपूल उभारण्याच्या निविदा विभागाने काढल्या होत्या. परंतु त्यामध्ये आता मोठा बदल होणार असून ३ पदरीऐवजी ६ पदरी उड्डाणपूल दोन्ही बाजूने उभारण्यात येणार आहे. याबाबत राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी विभागाला निर्देश दिले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून या कामी पाठपुरावा सुरु केला आहे.

सोलापूर-छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गाच्या बीडच्या वळण रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर अपघात होतात. येथील महालक्ष्मी चौकात उड्डाणपूल तयार केला तर हे अपघात टाळता येतील, असा प्रस्ताव डॉ.योगेश क्षीरसागर यांनी भुपृष्ठ वाहतूक मंत्रालयाकडे गतवर्षी दिला होता. यात महालक्ष्मी चौकातील उड्डाणपुलासोबतच स्लिप रोडची देखील मागणी करण्यात आली होती. या पत्रांचा संदर्भ देत ना.नितीन गडकरी यांच्या आदेशावरून भुपृष्ठ वाहतूक मंत्रालयाने तांत्रिक शक्यता तपासून अहवाल सादर केला. त्यांनतर इतर प्रक्रिया पूर्ण होऊन निविदाही पान ३ वर

# एकात्मिक पीक व्यवस्थापनाद्वारे हरभरा उत्पादनात वाढ शक्य -कृष्णा कर्डिले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

दीनदयाल शोध संस्थान कृषि विज्ञान केंद्र अंबाजोगाई माध्यमातुन निक्रा प्रकल्प अंतर्गत मौजे राजेवाडी येथे हरभरा प्रक्षेत्र दिनाचे आयोजन केले होते. यावेळी राजेवाडी गावाचे उपसरपंच रणजित गडकर, ग्राम हवामान आपत्ती व्यवस्थापन समिती अध्यक्ष भास्कर काशीद, कृविकेचे पिकविद्या शास्त्रज्ञ कृष्णा कर्डिले, पिक संरक्षण शास्त्रज्ञ डॉ.प्रदीप सांगळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे




प्रास्ताविक व मार्गदर्शन करताना कर्डिले यांनी कृषि विज्ञान केंद्राच्या माध्यमातून निक्रा प्रकल्पा अंतर्गत मागील ३ वर्षात झालेल्या बांधबंधिस्ती, फेरो सिमेंट पाणी साठवणूक हौद, बोर पुनर्भरण, माती परीक्षणानुसार अन्नद्रव्य व्यवस्थापन, सुधारित व हवामान बदलास अनुकूल नवीन वाणांचा लागवडीसाठी वापर, हवामान आधारीत कृषी सल्ला सेवा पत्रिका वापर, विविध आंतरपीक पद्धती, सोयाबीन बिजोत्पादन, रब्बी ज्वारी, हरभरा, एकात्मिक किड व रोग व्यवस्थापन,सेंद्रिय शेतीसाठी गांडूळखत निर्मिती, शेळीपालन करणाऱ्या शेतकऱ्यांना शेळ्याकरिता खनिज चाटण विटाचा वापर, जनावरांना पोष्टीक चाऱ्यासाठी फुले गुणवंत चारापिकांचे प्रात्यक्षिके, पशू आरोग्य पान ३ वर

# बीड शहरात वाहतूक शाखेची मोहीम; ३२६ वाहनावर केल्या केसेस

बीड । प्रतिनिधी

शुक्रवारी बीड शहरामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी मोहीम राबवून ३२६ केसेस करण्यात आलेले आहेत त्यामध्ये नो पार्किंगच्या ७० केसेस फॅन्सीनंबर प्लेट ८९ केसेस ब्लॅक फिल्म आठ केसेस विदाऊट लायसन ८२ केसेस अशा प्रकारे विविध हेड खाली केसेस करण्यात आलेले आहेत तसेच २१ सायलेन्सर जे की मोठे आवाज करून प्रदूषण निर्माण करत होते असे काढून घेण्यात आलेले आहे सदरची कारवाई माननीय पोलीस अधीक्षक व अप्पर पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली




सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष सानप व वाहतूक शाखेचे पोलीस हवालदार बापू जावळे विष्णू काकडे नितीन शिंदे दत्ता उबाळे सचिन साळवे तसेच पोलिस अंमलदार अजिनाथ मुंडे अनिकेत घुले महिला पोलिस अनिता पवार अशांनी केली आहे

# अभिषेक चावला बी.टेक परीक्षा उत्तीर्ण

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी शहरातील अभिषेक अनूप चावला याने बीटेक परीक्षा संगणक , विज्ञान,आणि अभियंता सी एस ई २४ जानेवारी २०२५ ला यूनिवर्सिटी कोयंबतूर तमिलनाडु चा निकाल लागला त्यात उत्कृष्ट गुण संपादन करून अभिषेकने यश प्राप्त केले आहे.डाटा मॅनेजमेंट सिस्टम, ए आई फेस रिकॉनॉजिशन, हयूमन एक्टिविटी रिकॉनाइजेशन इन वीडियो यूजिंग डीप लर्निंग, साइबर सिक्युरिटी फ़ॉर ई व्हीकल प्रोजेक्ट आणि सी. सी. एन. ए.,कंप्यूटर हार्डवेयर, साइबर सिक्युरिटी, माइक्रोसॉफ्ट अजूर, ए आई इंटर नेट ऑफ थिंक्स सारखे प्रोजेक्ट कोर्स सहित अनेक नॅशनल, इंटरनेशनल वर्कशॉप्स अभिषेक यानी केले आहे. अभिषेकने दहावीचे शिक्षण आष्टी पब्लिक स्कूल मध्ये झाले तर बारावीचे शिक्षण अहमदनगर जूनियर कॉलेजला झालेले आहे.बीटेक परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल अभिषेकचे सर्व स्तरातून मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# श्री संत वामनभाऊ महाराज व श्री संत भगवान बाबा यांची पुण्यतिथी २६ जानेवारी रोजी साजरी होणार

मानूर । प्रतिनिधी

**गेली २२ वर्षापासून शिरूर कासार येथील श्री संत वामनभाऊ महाराज प्रतिष्ठान श्री संत वामनभाऊ महाराज श्री संत भगवान बाबा यांची संयुक्त पुण्यतिथी साजरी करण्यात येते याही वर्षी दिनांक २६ जानेवारी २०२५ रोजी भव्य दिव्य प्रमाणात हा सोहळा साजरा होणार असून या सोहळ्यासाठी शिरूर कासार सर्व पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे**





गेल्या २२ वर्षापासून हा उपक्रम अत्यंत उत्साहवर्धक वातावरणामध्ये पार पडत असतो याही वर्षी या दोन्ही संतांच्या संयुक्त पुण्यतिथीचे आयोजन करण्यात आले असून संत वामनभाऊ महाराज प्रतिष्ठान येथे सकाळी या दोन्ही संतांच्या प्रतिमेची स्थापना करण्यात येणार असून दुपारी चार ते सहा भव्य रथातून मिरवणूक स्वर्गीय लोकनेते गोपीनाथ मुंडे चौक ते जिजामाता चौक ते संभाजी महाराज चौक निघणार असून या मिरवणुकीमध्ये टाळ मृदंगाच्या गजरात व ढोल ताशांच्या निनादांमध्ये व दोन्ही संतांच्या जयजयकारांमध्ये हा सोहळा पार पडणार आहे शेवटी ही मिरवणूक येथील श्री सिद्धेश्वर संस्थान मध्ये विसर्जित करण्यात येते हा सर्व सोहळा श्रीक्षेत्र गहिनीनाथ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# आयटीनगरीत काँक्रिट मिक्सर पलटल्याने दोन तरुणींचा मृत्यू; चार क्रेनच्या मदतीने हटविला मिक्सर

हिंजवडी । प्रतिनिधी

भरधाव वेगाने आलेल्या काँक्रिट मिक्सर गाडी चालकाचे हिंजवडीतील वडजाईनगर वळणावर नियंत्रण सुटल्याने काँक्रिटने भरलेला मिक्सर माण म्हाळुंगे रस्त्याला पलटी झाला. तिथून दुचाकीने जात असलेल्या दोन तरुणींचा मिक्सरखाली चिरडून दुर्दैवी अंत झाला. मिक्सर काँक्रिटने गच्च भरला असल्याने या तरुणींचा चेंदामेंदा झाला होता. त्यांची ओळख पटणे देखील अवघड झाले आहे.




तशीच अवस्था त्यांच्या दुचाकीची झाली आहे. हा मिक्सर इतका वजनदार होता की त्याला हटविण्यासाठी चार क्रेन लावाव्या लागल्या हा भीषण अपघात शुक्रवारी ( दि २४ )सायंकाळी सव्वाचार वाजता जी वन मार्केट समोर झाला. घटनेची माहिती मिळताच हिंजवडी पोलीस, वाहतूक पोलीस, अग्निशामक दल, गुन्हे शाखेचे अधिकारी, वरिष्ठ पोलीस अधिकारी घटनास्थळी पोहचले. गाडीत पूर्ण रेडिमिक्स कॉंक्रीट असल्याने पलटी झालेला डंपर बाजूला करणे चार चार क्रेनला ही अवघड झाले होते. दरम्यान रस्त्यावर चार चार किलोमीटर वाहतूक कोंडी झाली होती. पोलिसांनी उत्तरीय तपासणीसाठी मृतदेह औंध जिल्हा रुग्णालयात पाठविले असून उशिरापर्यंत मृत तरुणींची ओळख पटलेली नव्हती. दरम्यान सहाय्यक पोलीस आयुक्त सुनील कुऱ्हाडे, हिंजवडीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कन्हेय्या थोरात, गुन्हे शाखेचे निरीक्षक अरविंद पवार यांनी घटनास्थळी भेट देऊन आढावा घेत वाहतूक सुरळीत करण्याच्या सूचना दिल्या.

दरम्यान प्रत्यक्षदर्शीनी दिलेल्या माहितीनुसार या तरुणी म्हाळुंगेकडून आल्या होत्या. त्यांची कुठलीही चूक नसताना या निष्पाप मुलींना आपला जीव गमवावा लागला. त्या आयटी अथवा इतर कुठल्यातरी कंपनीत काम करणाऱ्या तरुणी असाव्यात अशी शक्यता प्रत्यक्षदर्शीनी व्यक्त केली आहे.

# सासवडचा चेहरामोहरा बदलणार; विजय शिवतारे यांची ग्वाही

सासवड । प्रतिनिधी

सासवड शहर येणार्या कालावधीत अत्यंत महत्त्वाचे शहर म्हणून उदयास येणार आहे. पुरंदर तालुक्यात होत असलेल्या राष्ट्रीय महामार्ग, रिंग रोड, आंतरराष्ट्रीय विमानतळ यासारख्या प्रकल्पांमुळे शहराला अनन्यसाधारण महत्त्व येणार आहे. त्यामुळे शहराच्या विकासासाठी रस्ते, गटार, वीज आणि उद्याने अशा सर्व सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न मी करणार असल्याची ग्वाही आमदार विजय शिवतारे यांनी दिली आहे.



सासवड (ता. पुरंदर) येथे नगरपरिषदेच्या सभागृहात आयोजित आढावा बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना आ. शिवतारे यांनी ही माहिती दिली. या वेळी सासवड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण, नगरसेवक सचिन भोंगळे, माजी उपनगराध्यक्ष दीपक टकले, माजी उपनगराध्यक्ष वामन जगताप, संजय ज्ञा. जगताप, विद्या टिळेकर, अस्मिता रणपिसे, माजी नगरसेवक राजेश दळवी, शहरप्रमुख मिलिंद इनामके, कुंडलिक जगताप, मंदार गिरमे, राजू शिंदे, धनंजय म्हेत्रे, संदीप मु. जगताप, मंगेश भिंताडे, अतुल जगताप, प्रकाश जगताप, ओंकार जगताप, अविनाश बडदे आदी उपस्थित होते.

या वेळी शिवतारे यांनी सासवड शहरासाठी मंजूर केलेली १४३ कोटींची नवीन पाणीपुरवठा योजना लवकरात लवकर सुरू करण्याचे आदेश दिले. सासवड शहरात कार्डीयाक रुग्णवाहिका आणि शववाहिनी नाही, अद्ययावत अग्निशमन यंत्रणा नाही, ती उभारण्यासाठी निधीची तरतूद करणार आहे. सासवड शहरातील सर्व रस्ते सुधारण्यासाठी राज्य सरकारच्या नगरोत्थान योजनेतून १५६ कोटी रुपयांचा निधी मागितला असून त्यासाठी देखील मी पाठपुरावा करणार आहे, असेही शिवतारे म्हणाले. सासवड शहरातील उद्याने बंद असल्याची बाब काही नागरिकांनी शिवतारे यांच्या निदर्शनास आणून दिली. ही उद्याने नागरिकांसाठी खुली करावीत. त्यासाठी काही आर्थिक अडचणी असल्यास निधीची मागणी करावी, तो उपलब्ध करून दिला जाईल अशा सूचना शिवतारे यांनी केल्या. याशिवाय सासवड नगरपालिकेने सौर उर्जा प्रकल्प उभारला असला तरी तो रोहित्र नसल्याने कार्यान्वित करण्यात आलेला नाही. जिल्हा नियोजन समितीकडून रोहित्रासाठी निधी मागणी करावी, असे या वेळी आमदार शिवतारे यांनी सूचित केले.

# घोटाळे झाले, तर सरकार कारवाई का करत नाही; सुप्रिया सुळे यांचा सरकारला प्रश्न

इंदापूर: राज्याचे कृषिमंत्री म्हणतात, ४०० कोटी रुपयांचा पीक विमा घोटाळा झाला. सुरेश धस म्हणाले, ५ हजार कोटींचा घोटाळा झाला. हे सरकारच घोटाळा झाला मान्य करत आहे. मग कारवाई का करत नाही, असा सवाल खा. सुप्रिया सुळे यांनी केला. इंदापुरात पत्रकार परिषदेत खासदार सुळे बोलत होत्या.



खा. सुळे म्हणाल्या, हार्वेस्टरमागे सरकारने ८ लाख मागितले, हे गंभीर आहे. भ्रष्टाचार होतो, हे मंत्रीच कबूल करत आहेत. हे मी संसदेच्या अधिवेशनामध्ये मांडणार आहे. राज्यात कायदा-सुव्यवस्था राहिला नाही. सरकारला दोन महिने झाले आहेत. ते १०० दिवसांचा कार्यक्रम देणार होते. ६० दिवस झाले. कोणताही ठोस निर्णय झाला नाही, असा आरोप त्यांनी केला. इंदापूरवर अन्याय झाला. पालकमंत्रिपद दिले नाही. यासाठी मी सरकारला बोलणार आहे, असेही खा. सुळे म्हणाल्या. राज्यात झालेल्या घटना गंभीर आहेत. मला आश्चर्य वाटते, सरकारला झोप कशी येते? मी सरकारमध्ये असते, तर राजीनामा दिला असता. हे दावोसला गेले, पण उद्योजक कल्याणी आणि जिंदाल हे पुणे, मुंबई येथेच भेटतात. मग त्यांच्या सहीसाठी दावोसला जाण्याची गरज नव्हती, असाही टोला खा. सुळे यांनी लगावला. बदलापूर घटनेतील आरोपी अक्षय शिंदे याच्या एन्काउंटरवरून न्यायालयाने पोलिसांना दोषी ठरवले आहे. या प्रकरणाची चौकशी समिती नेमली आहे. यावरून खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या, चॉइस ऑफ जेल हा कन्सेप्ट मोडून काढला पाहिजे. आज-काल आरोपी देखील कोणत्या जेलमध्ये जायचे, याला पसंती देत आहेत. बीड प्रकरणातील चाटे यांनी लातूर जेलमध्ये मला ठेवावे, अशी मागणी केली आहे. त्यावर सुप्रिया सुळे यांनी चॉइस ऑफ जेल हे मोडूनच काढले पाहिजे. एवढा मोठा जनाधार या सरकारला मिळाला आहे. सातत्याने सर्वसामान्य माणसांना फसवल्याचा फील का येतोय, असं म्हणत खा. सुप्रिया सुळे यांनी सरकारवर निशाणा साधला.

# कर्मचाऱ्यांनी दिलेल्या वागणुकीच्या विरोधात महिलेचे पोलीस ठाण्यासमोरच उपोषण

वाघोली । प्रतिनिधी

वाघोली तालुका हवेली येथील पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्यांनी दिलेल्या वागणुकीबाबत व महिलेवर झालेल्या अन्यायाबाबत दि. २६ रोजी सकाळी सहा वाजता एक महिला आमरण उपोषणाला बसणार आहे.



वाघोली तालुका हवेली येथील एका घरगुती वादातून समोरच्या व्यक्तीला समाधान मिळावे यासाठी एका महिलेला सायंकाळी तिच्या राहत्या घरातून कोणतीही नोटीस अथवा कोणता गुन्हा अथवा कोणताही अदखलपात्र गुन्हा दाखल नसताना पोलीसांनी महिलेला उचलून पोलीस ठाण्यात आणले असा आरोप त्या महिलेने केला आहे.

पोलीस उपायुक्तांकडे प्रतिबंधात्मक कारवाईची प्रक्रिया चालू असताना देखील कोणताही वाद झाला नसताना वाघोली पोलिसांकडून मिळालेल्या वागणुकीबाबत त्रस्त महिलेने पोलीस आयुक्त, उपायुक्त यांच्याकडे लेखी तक्रारी करून न्याय मागितला आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुट्टीवर गेल्यानंतर काही कर्मचाऱ्यांकडून महिलेला जाणीवपूर्वक त्रास दिला असल्याची चर्चा वाघोलीत मोठ्या प्रमाणात वाढली आहे. वरिष्ठ याप्रकरणी कोणती कारवाई करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# गुन्हा मागे घेण्याची धमकी देत दाम्पत्यावर कोयत्याने वार; तक्रारवाडी येथील घटना

भिगवण । प्रतिनिधी

गुन्हा मागे घेण्याची धमकी देत पाच जणांनी पती-पत्नीवर कोयत्याने वार करून त्यांना जिवे मारण्याचा प्रयत्न केला. तक्रारवाडी (ता. इंदापूर) येथील उजनी पाणलोट क्षेत्रात गुरुवारी (दि. २३) सकाळी ही घटना घडली. याप्रकरणी भिगवण पोलिस ठाण्यात अ‍ॅट्रॉसिटी कायद्यासह अन्य कलमांन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.




किशोर गजरे, राजेश मोरे, हिरा गजरे, विनोद मोरे आणि गणेश परदेशी (सर्व रा. तक्रारवाडी, ता. इंदापूर) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. हे सर्व जण पसार झाले आहेत. याप्रकरणी मालन ऊर्फ रेश्मा शहाजी काळे (रा. तक्रारवाडी) यांनी फिर्याद दाखल केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी सकाळी फिर्यादी मालन काळे, त्यांचे पती शहाजी व मुलगा अजय हे होडीतून उजनी पाणलोट क्षेत्रात मासेमारी करण्यासाठी गेले होते. या वेळी आरोपी देखील होडीतून त्यांच्याजवळ आले. आमच्यावर पोलिसांत दाखल केलेला गुन्हा मागे घ्या, असे म्हणत किशोर गजरे, राजेश मोरे व साथीदारांनी शहाजी यांच्या पाठीवर कोयत्याने वार केले, यात ते गंभीर जखमी झाले. या वेळी त्यांना सोडवण्याचा प्रयत्न केला असता मालन यांच्याही उजव्या मनगटावर कोयत्याने वार करण्यात आले. त्यानंतर सर्वांनी दोघांना लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. तर अजय मोरेला 'जिवंत सोडणार नाही,' अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. त्यानुसार पोलिसांनी संबंधितांवर अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा तसेच बेकायदेशीर जमाव जमवणे, हत्यार घेऊन दंगल माजवणे, जिवे मारण्याचा प्रयत्न करणे आदी कलमांतर्गत आरोपींवर गुन्हे दाखल केले आहेत. बारामतीचे विभागीय पोलिस अधिकारी या घटनेचा तपास करीत आहेत.

# एमपीएससी संयुक्त पूर्व परीक्षेची प्रवेशपत्रे ऑनलाइन उपलब्ध

पुणे । प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) दि. २ फेब्रुवारी रोजी घेण्यात येणारी महाराष्ट्र गट-ब, अराजपत्रित सेवा संयुक्त पूर्व परीक्षेची प्रवेशपत्रे उमेदवारांना एमपीएससीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

परीक्षेला येण्यापूर्वी उमेदवारांनी प्रवेशपत्र डाऊनलोड करून त्यांची प्रिंट सोबत आणावी, अशी सूचना आयोगाने दिली आहे. राज्यभरात दि. २ फेब्रुवारी रोजी एमपीएससीची पूर्व परीक्षा होत आहे. यामध्ये प्रामुख्याने आंदोलने, मोर्चे, वाहतूककोंडी आणि अतिवृष्टी या समस्यांना उमेदवारांना सामोरे जावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे खबरदारी म्हणून परीक्षा केंद्रावर दीड तास अगोदर उपस्थित रहावे तसेच प्रत्यक्ष परीक्षा सुरू होण्याच्या वेळेपूर्वी एक तास अगोदर परीक्षा कक्षातील स्वत:च्या बैठक क्रमांकावर उपस्थित राहणे अनिवार्य राहील.

# लहु बालवडकरांच्या अटलसेवा आरोग्य शिबिराला नागरिकांचा उदंड प्रतिसाद -चंद्रकांत पाटलांची उपस्थिती

बालेवाडी : भाजपचे शहर चिटणीस लहु बालवड यांच्या 'लहू बालवडकर सोशल वेलफेअर' व 'सनराईस मेडिकल फाऊंडेशन' यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य 'अटलसेवा महाआरोग्य' शिबीराचे उद्घाटन आज राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अनेक मान्यवरही उपस्थित होते. यानंतर शिबिराला सुरुवात करण्यात आली. दिवसभरात या शिबीराला लोकांचा मोठा प्रतिसाद बघायला मिळाला. उद्या देखील हे शिबीर सुरू राहणार आहे.

आरोग्य हीच सर्वात मोठी संपत्ती असून निरोगी आयुष्य हेच माणसांच्या जीवनाचे खरी महत्व आहे. त्यामुळेच अनेक मोठ्या आजारांवरती उपचार हे पूर्ण:त मोफत मिळावे हा संकल्प लहु बालवडकर यांनी ठेऊन अटलसेवा महाआरोग्य शिबीर सुरू करण्यात आले.

आज दिनांक २४ जानेवारी रोजी जवळपास पाच ते सहा हजार पेक्षा अधिक लोकांची नाव नोंदणी झाली.



यात विविध आजारांची तपासणी, चाचण्या तसेच लोकांना औषध देखील मोफत देण्यात आली. यात लहान मुलांपासून ते अगदी वयोवृद्धांपर्यंत नागरिकांनी मोफत तपासणी करून घेतली. याप्रसंगी सनराईज मेडिकल फाउंडेशनचे डॉक्टर सतीश कांबळे, ह.प. चैतन्य महाराज वाडेकर, डिजिटल मीडिया पत्रकार संपादक संघटनेचे अध्यक्ष राजा माने, माजी नगरसेवक अमोल बालवडकर, माजी नगरसेविका ज्योती कळमकर, माजी नगरसेविका स्वप्नाली सायकर, शहर उपाध्यक्ष गणेश कळमकर, पूनित जोशी , उत्तर मंडल अध्यक्ष सचिन पाषाणकर, माजी नगरसेवक दीपक पोटे, प्रल्हाद सायकर, राहुल कोकाटे, सचिन दळवी, मोरेश्वर बालवडकर, अस्मिता करंदीकर, उमा गाडगीळ आदी कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी चंद्रकांत पाटील यांनी लहु बालवडकर यांच्या आरोग्य सेवेचं भरभरून कौतुक केले. तसेच कोविडचा काळ सगळ्यांनी अनुभवला आहे. त्यानंतर आपल्या सर्वांच्या आयुष्यात आरोग्याचं महत्त्व आणखी वाढलं आहे. अशा परिस्थितीत अशी आरोग्य शिबीर सर्वांसाठी मोफत घेणे, हे अत्यंत कौतुकास्पद आहे. बालवडकर यांनी घेतलेल्या शिबीरात अजून लोकांनी येऊन आपल्या आरोग्याची तपासणी करून घ्या, असे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले. तसेच यापासून अशी शिबिरे प्रत्येकाने घेतली पाहिजेत, भरवली पाहिजेत, असेही चंद्रकांत पाटील यांनी म्हटले. दरम्यान, अटल सेवा महाआरोग्य शिबीराचे वैशिष्ट्ये म्हणजे सर्व तपासण्या आणि शस्त्रक्रिया अगदी मोफत होणार आहेत. यासाठी मुंबई, पुणे आणि पिंपरी चिंचवड येथील ६० नामांकित रूग्णालय आणि तज्ञ डॉक्टर सहभागी झाले आहेत. आज अनेक लोकांनी प्रत्यक्ष शिबिरात येऊन तपासण्या केल्या. त्यावर डॉक्टरांनी औषध उपचार देखील केलेत. अशी आरोग्य सेवा करण्याचे भाग्य मला मिळाले आहे. ही सेवा अशीच पुढे चालत रहो आणि हे शिबिर उद्यादेखील सुरू राहणार आहे. त्यामुळे ज्यांनी ज्यांनी अजून या शिबिरात भेट दिली नाही. त्यांनी याठिकाणी येऊन तपासण्या, चाचण्या करून घ्याव्यात, असे आवाहन लहु बालवडकर यांनी केले आहे.

# भिंतचित्रणाद्वारे कचरा वर्गीकरणाची जनजागृती

माळेगाव । प्रतिनिधी

माळेगाव बुद्रुक, पोलीस स्टेशन परिसरात कचरा वर्गीकरणावर शिवनगर विद्या प्रसारक मंडळातील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या विद्यार्थ्यांची भिंतचित्रणाद्वारे जनजागृती केली.

स्वच्छ भारत अभियानाच्या अंतर्गत शिवनगर विद्या प्रसारक मंडळातील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्याच्या एमबीए विभागातील विद्यार्थ्यांनी कचरा वर्गीकरणाबाबत जनजागृती करण्यासाठी भिंतचित्रणाचा उपक्रम राबविला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी भिंतींवर कचरा वर्गीकरणाच्या महत्त्वाबाबत आकर्षक चित्रे व संदेश रेखाटले. यामध्ये ओला व सुका कचरा, इलेक्ट्रॉनिक कचरा, सॅनिटरी कचरा वेगवेगळ्या प्रकारे कसा वर्गीकृत करावा याबाबत माहिती दिली गेली. या भिंतचित्रांद्वारे कचरा व्यवस्थापनाबाबत जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. एमबीए कॉलेजचे संचालक डॉ. ज्ञानेश्वर पिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. वंदना शिंदे यांनी या उपक्रमाचे आयोजन केले होते. संस्थेचे संचालक, प्राध्यापक, आणि विद्यार्थ्यांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी बोलताना डॉ. ज्ञानेश्वर पिसाळ म्हणाले की विद्यार्थ्यांच्या या सर्जनशील प्रयत्नामुळे परिसरात स्वच्छतेबाबत सकारात्मक संदेश पोहोचला आहे. एमबीए इन्स्टिटच्युटच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, भविष्यातही असे उपक्रम राबवून स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात येईल.


# रोहित्रातील तांब्याच्या तारा चोरणारी आंतरराज्यीय टोळी गजाआड

पुणे: शेतकऱ्यांनी बसविलेल्या शेतपंपाना विजपुरवठा करण्यासाठी लागणार्या रोहित्रातील (डी.पी) तांब्याच्या तारा चोरणार्या टोळीला गुन्हे शाखा यूनिट सहाच्या पथकाने अटक केली. त्यांच्याकडून १० लाख ४२ हजार रुपयांच्या ८८५ किलोच्या तांब्याच्या तारा जप्त केल्या. तर, १२ गुन्हे उघडकीस आणले आहेत. अबरार बिलाल अहमद (२४, रा. उत्तरप्रदेश), आफताब नियामतउल्ला खान (३२, रा. नवी मुंबई), नफीज हमीद अब्दुल (२३, रा. उत्तरप्रदेश), मोबीन हमीद अब्दुल अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

ही कारवाई यूनिट सहाचे पोलीस निरीक्षक वाहीद पठाण, कानिफनाथ कारखेले, रमेश मेमाणे, सुहास तांबेकर, बाळासाहेब तनपुरे यांच्यासह पथकाने ही केली. ग्रामीण भागात शेतपंपांना वीज पुरवठा करणार्या महावितरणच्या रोहित्राची तोडफोड करून त्यातील तांब्याच्या तारा चोरीला जाण्याच्या घटना वाढल्या होत्या. यापार्श्वभूमीवर चोरट्यांचा शोध घेण्याच्या सूचना वरिष्ठ अधिकार्यांकडून दिल्या होत्या. यानुसार,यूनिट सहाचे पोलीस निरीक्षक वाहीद पठाण यांच्या मार्गदर्शनाखाली पथक लोणीकंद तसेच वाघोली भागात आरोपींचा शोध घेत होते. या दरम्यान तांत्रिक तपासातून मिळालेल्या माहितीनूसार पोलिसांनी चौघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे केलेल्या चौकशीत त्यांनी ग्रामीण भागात तांब्याच्या तारा चोरी केल्याचे समोर आले. यानूसार चौघांना अटक केली. त्यांच्याकडून १० लाख ४२ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी या तारा चोरल्यानंतर कोणाला विकत होते, याबाबत पोलिसांकडून तपास करण्यात येत आहे.

# पुढाऱ्यांच्या चुकांमुळे सुसंस्कृत महाराष्ट्राला गालबोट; संभाजीराजे यांची टीका

पुणे: क्रांतिसिंह नाना पाटील हे बीडमधून खासदार म्हणून निवडून आले होते. तेव्हाचे सुसंस्कृत बीड आज राहिले नाही. सद्य:स्थितीत बीडमध्ये आज टोळ्या फिरताना दिसत आहेत. चूक तिथल्या नागरिकांची नसून पुढार्यांची आहे. पुढार्यांच्या चुकांमुळे सुसंस्कृत महाराष्ट्राला गालबोट लागल्याची खंत माजी खासदार संभाजीराजे यांनी बीड आणि राज्याच्या परिस्थितीवर व्यक्त केली.



महात्मा फुले इतिहास अकादमी, राष्ट्रसेवा समूह, रयत प्रकाशन आणि गिरिप्रेमी ग्रुप यांच्या वतीने राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार वितरण समारंभात संभाजीराजे बोलत होते. प्रसिद्धीपासून दूर असलेल्या राज्यातील विविध शहरांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेल्या शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. सनदी अधिकारी विपुल वाघमारे, इतिहास अभ्यासक श्रीमंत कोकाटे, श्रीराम शिक्षण संस्थेच्या श्रीलेखा पाटील, उद्योजक गणेश माने देशमुख, माजी आमदार दत्तात्रय सावंत, शिक्षण निरीक्षक रावसाहेब मिरगणे, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचार्यांचे नेते शिवाजीराव खांडेकर, महेश शिंदे, योगेश निंबाळकर आदी उपस्थित होते.

संभाजीराजे म्हणाले, शाळांमधील विद्यार्थ्यांना घडविण्याची जबाबदारी शिक्षकांची आहे. भविष्यातील समाजासाठी विद्यार्थ्यांना घडविण्याची जबाबदारी शिक्षकांनी घेतली, तर फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांचा महाराष्ट्र घडल्याशिवाय राहणार नाहीत. सध्याची शिक्षण क्षेत्रातील परिस्थिती पाहता शिक्षक आणि विद्यार्थी यांचे नाते तुटत आहे. हे नाते पुन्हा जुळायला हवे. सुसंस्कृत महाराष्ट्र घडविण्याचे काम चांगल्या शिक्षणाने होणार आहे. सरकारने सरकारी शाळांना पायाभूत सुविधा पुरवायल्या हव्यात. शिक्षकांना निवडणुकीची कामे द्यायची काय आवश्यकता आहे? सध्या शिक्षक शिक्षणाचे काम सोडून सर्वच कामे करतात. या परिस्थितीत त्यांना शिकवण्यासाठी वेळ कधी मिळणार, असा प्रश्नही संभाजीराजेनी उपस्थित केला. वाघमारे म्हणाले, शिक्षक केवळ रोजगारासाठी व्यक्ती तयार करण्याचे काम करतो. मात्र, आता त्यांनी चाकोरीच्या त्यापलीकडे जाऊन रोजगारनिर्मिती करणारे व्यक्ती घडविण्याची आवश्यकता आहे. शिक्षकांनी शिक्षणाची व्याप्ती वाढण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी फिनलंड शिक्षण व्यवस्था, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, आर्थिक साक्षरता अशा विषयांची माहिती घेऊन, ती विद्यार्थ्यांना देण्याची गरज आहे. प्रास्ताविक औदुंबर लोंढे यांनी केले.

# तालुक्यातून प्रथम आलेल्या तीन शाळांची अंतिम तपासणी

वडगाव मावळ : शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन अभियानाच्या अंतिम टप्प्यात मावळ तालुक्यात प्रथम आलेल्या तीन माध्यमिक शाळांची गुणवत्ता तपासणी करण्यात आली.

तालुक्यात प्रथम आलेल्या माळेगाव येथील वरसुबाई विद्यालय, तळेगाव येथील ड पु.वा. परांजपे विद्यामंदिर व वडगाव मावळ येथील न्यू इंग्लिश स्कूल यांची अंतिम तपासणी मुख्याध्यापक संघाच्या पथकाने केली. या पथकात मुख्याध्यापक संभाजी पडवळ, सुबोध गलांडे, विठ्ठल माळशिकारे, हेमलता कोकणे, विनोद वाळके, जे पी मिश्रा यांचा समावेश होता.शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन अभियानात मावळ तालुक्यातील एकूण ९३ शाळा सहभागी झाल्या होत्या. या शाळांचे संख्येनुसार गट करण्यात आले होते. जिल्हा तपासणी पथकाकडून संपूर्ण जिल्ह्यातील सर्व माध्यमिक शाळांची तपासणी होऊन त्यातून प्रथम क्रमांक द्वितीय क्रमांक व तृतीय क्रमांक काढले जाणार आहे. गटशिक्षणाधिकारी सुदाम वाळुंज यांच्या मार्गदर्शनाखाली मावळ तालुक्यात हे अभियान राबविण्यात आले.